SAMPLE CONTENT

# SMART NOTES

इयत्ता अकरावी

## वाणिज्य संघटन व व्यवस्थापन



Target Publications® Pvt. Ltd.

SMART NOTES

# वाणिज्य संघटन व व्यवस्थापन

## इयत्ता अकरावी

(महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांच्याद्वारे प्रकाशित करण्यात आलेल्या व २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यात आलेल्या अद्ययावत पाठ्यपुस्तकावर आधारित.)

**ठळक वैशिष्ट्ये**

- नवीन पाठ्यपुस्तकावर आधारित.
- प्रश्नोत्तरांच्या स्वरूपामध्ये पाठांचा परिपूर्ण आढावा.
- परीक्षेच्या दृष्टीने उत्तरांची सुयोग्य मांडणी.
- मुद्दे लक्षात ठेवण्यासाठी 'झटपट उजळणी' समाविष्ट.
- 'ज्ञानात भर' या शीर्षकांतर्गत संकल्पनांचे सविस्तर स्पष्टीकरण.
- संकल्पनांना वास्तविकतेची जोड देणारा 'ज्ञानगुरू' समाविष्ट.
- विषयासंदर्भात अधिक माहिती देणारे Q. R. Codes उपलब्ध.
- दैनंदिन जीवनातील उदाहरणांचा समावेश.
- उत्तरे लक्षात राहण्याकरता महत्त्वपूर्ण शब्द ठळक स्वरूपात.
- प्रत्येक पाठाच्या सुरुवातीला पाठाचा आढावा घेण्याकरता प्रश्नांची सारणी

Sample Content

Printed at: **Repro India Ltd.,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022 | **TEID: 1992** | P.O. No. 3107

## प्रस्तावना

टार्गेट प्रकाशनाचे **Smart Notes वाणिज्य संघटन व व्यवस्थापन: इयत्ता अकरावी** हे पुस्तक विद्यार्थ्यांचे या विषयाचे आकलन व ज्ञान समृद्ध करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आले आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संकल्पना अधिक स्पष्टपणे समजतील व विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागेल.

या पुस्तकात पाठ्यपुस्तकातील सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यात आली आहेतच. सोबतच पाठाचा संपूर्ण आढावा घेण्याच्या दृष्टीने काही अधिकच्या प्रश्नांचाही यात समावेश करण्यात आला आहे. सर्व प्रश्नांची उत्तरे ही सविस्तर, मुद्देसूद व परीक्षेच्या दृष्टीने आदर्श उत्तरे आहेत. यामुळे, विद्यार्थ्यांना परीक्षेला सामोरे जाणे सोपे जाईल.

दीर्घ व अवघड उत्तरे सहज लक्षात राहावीत म्हणून आवश्यक तेथे 'झटपट उजळणी' देण्यात आली आहे. शक्य तेथे महत्त्वाचे शब्द ठळक करून देण्यात आले आहेत. ज्यामुळे, उत्तर लक्षात ठेवणे सोपे जाईल. संकल्पनांचे आकलन उत्तमरीतीने व्हावे याकरता आवश्यक तेथे 'ज्ञानात भर' या शीर्षकाखाली मुद्द्याचे अधिक स्पष्टीकरण देण्यात आले आहे. तसेच, संकल्पनांना वास्तविकतेची जोड देणारा 'ज्ञानगुरू' रंजक व व्यावहारिक माहिती देण्यासाठी तुम्हांला पुस्तकात ठिकठिकाणी भेटेल. काही मुद्द्यांसंदर्भात अधिकची माहिती देण्यासाठी या पुस्तकात अनेक ठिकाणी Q. R. Codes समाविष्ट करण्यात आले आहेत.

विद्यार्थ्यांचे विषयाचे ज्ञान सखोल व परिपूर्ण करणारी या पुस्तकाची अनोखी रचना विद्यार्थी, पालक व शिक्षक सर्वांच्याच पसंतीस उतरेल असा आम्हांला विश्वास वाटतो.

हे पुस्तक परिपूर्ण होण्याकरता आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. पुस्तकाची उत्कृष्टता अधिकाधिक वाढावी याकरता आपल्या सूचना व प्रतिक्रिया स्वागतार्ह आहेत. आपला अभिप्राय पुढील इ-मेल पत्त्यावर पाठवू शकता.

इ-मेल आयडी: mail@targetpublications.org

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on textbook 'वाणिज्य संघटन व व्यवस्थापन; दुसरे पुनर्मुद्रण: २०२१' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

## ‘ वाणिज्य संघटन व व्यवस्थापन ’ हा विषय का शिकावा?

परीक्षेत उत्तम गुण मिळवण्यासोबतच हा विषय शिकण्याचे इतरही अनेक फायदे आहेत.

१. नावाप्रमाणेच हा विषय ‘वाणिज्य संघटन’ व ‘व्यवस्थापन’ या दोन बाबींवर भर देतो. ह्या दोन्ही बाबी व्यावहारिक जीवनात अत्यंत महत्त्वाच्या आहेत. नोकरी असो किंवा व्यवसाय, या बाबींचे ज्ञान आपल्याला कायमच उपयोगी पडणारे असे आहे.

२. या अभ्यासक्रमातील दोन पाठ व्यवसाय संघटनांच्या विविध प्रकारांचे ज्ञान प्रदान करतात. वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय संघटनांच्या प्रकारांचे सविस्तर ज्ञान अतिशय महत्त्वाचे ठरते. हे ज्ञान तुम्हांला भविष्यातही कायम उपयोगी ठरेल.

३. यापूर्वीच्या इयत्तांमध्ये तुम्ही नाबार्ड आणि सिडबीबद्दल काही माहिती मिळवली असेल; मात्र या पुस्तकामधील पाठ तुम्हांला या संस्था आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये जी महत्त्वाची भूमिका पार पाडतात त्याविषयी एक वेगळा दृष्टिकोन देईल. शेतकरी आणि ग्रामीण भागातील गरिबांच्या प्रगतीकरता शासन अनेक प्रकारचे प्रयत्न करत आहे. या विषयाच्या अभ्यासातून आपण हे अधिक चांगल्या तऱ्हेने समजून घेऊ शकतो.

४. यासोबतच हा विषय आपला व्यवस्थापन या विषयाशी परिचय करून देतो. आपल्यापैकी अनेकांची व्यवस्थापन क्षेत्रामध्ये करिअर करण्याची आणि उच्च व्यवस्थापकीय पद भूषवण्याची इच्छा असते आणि म्हणूनच ह्या विषयाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

## या पुस्तकातून अभ्यास कसा कराल?

या पुस्तकाचे दोन विभाग करण्यात आले आहेत:

**१) दीर्घोत्तरी प्रश्न** **२. वस्तुनिष्ठ/आकलनाधारित प्रश्न**

**दीर्घोत्तरी प्रश्न:**

येथे देण्यात आलेल्या प्रश्नांचा क्रम हा धड्याच्या ओघाशी मिळताजुळता आहे. त्यामुळे, एकदा तुम्ही ही सर्व प्रश्नोत्तरे वाचलीत, की तुमचा पाठ्यपुस्तकातील धडा पूर्ण वाचल्यासारखेच होईल. तेव्हा तुम्ही प्रथम ह्या विभागाचा अभ्यास करावा.

**वस्तुनिष्ठ/आकलनाधारित प्रश्न:**

हा विभाग दीर्घोत्तरी प्रश्न विभागानंतर येतो. यातील प्रश्न वस्तुनिष्ठ किंवा ज्ञानाच्या उपयोजनावर आधारित आहेत. दीर्घोत्तरी प्रश्नांचा अभ्यास केल्यानंतर ह्या विभागातील प्रश्नांची उत्तरे देणे तुम्हांला सहजसोपे होईल. शिवाय, तुमची तयारी तपासून पाहण्याकरता उत्तरे दिली आहेतच.

Sample Content

# वैशिष्ट्ये

### झटपट उजळणी

काही वेळा प्रश्नांची उत्तरे खूपच मोठी व थोडी अवघड असतात. अशा वेळी संपूर्ण उत्तर लक्षात ठेवणे अवघड जाते. यासाठी संपूर्ण उत्तराचा संक्षिप्त आढावा घेणारी 'झटपट उजळणी' या पुस्तकात समाविष्ट करण्यात आली आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना उजळणी करणे सोपे जाईल.

### ज्ञानात भर

काही संकल्पना थोड्या अवघड किंवा गोंधळात टाकणाऱ्या असतात. त्या समजण्यासाठी थोडेसे स्पष्टीकरण पुरेसे होत नाही. म्हणूनच, 'ज्ञानात भर' या शीर्षकांतर्गत अशा संकल्पना अधिक सुस्पष्टपणे समजावून सांगितल्या आहेत. येथे दिलेली माहिती परीक्षेत लिहिण्याची आवश्यकता नाही. ही माहिती केवळ संकल्पना चांगल्या पद्धतीने समजून घेण्याकरता आहे.

### ज्ञानगुरू

तुम्ही शिकत असलेल्या विषयासंबंधी तुम्हांला व्यावहारिक जीवनातील उदाहरणे किंवा रंजक माहिती देण्यासाठी ज्ञानगुरू नावाचा एक खास मित्र तुम्हांला पुस्तकात ठिकठिकाणी भेटेल.

### Q. R. Codes

या विषयाचे आपल्या दैनंदिन जीवनात विविध प्रकारे उपयोजन करता येते. एखाद्या संकल्पनेशी संबंधित एखादा वर्तमानपत्रातला लेख किंवा व्हिडिओ तुम्हांला त्या संकल्पनेशी अधिक जोडून घेण्यात मदत करेल. अशी माहिती देणाऱ्या काही लिंक्स तुम्हांला Q. R. Code मार्फत दिल्या आहेत.

Sample Content

## पुस्तकात देण्यात आलेले विविध प्रश्नप्रकार

या पुस्तकात तुम्ही पुढील प्रकारांतील प्रश्नांचा अभ्यास करणार आहात.

| अनु.क्र. | प्रश्नप्रकार | पाठ १ | पाठ २ | पाठ ३ | पाठ ४ | पाठ ५ | पाठ ६ | पाठ ७ | पाठ ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | **दीर्घोत्तरी प्रश्न विभाग** | | | | | | | | |
| १. | खालील प्रश्नांची उत्तरे लिहा, खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा, खालील प्रश्न सोडवा. (हे सर्व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा या शीर्षकांतर्गत देण्यात आले आहे.) | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| २. | फरक स्पष्ट करा. | ✓ | ✓ | NA | ✓ | ✓ | NA | ✓ | ✓ |
| | **वस्तुनिष्ठ प्रश्न विभाग** | | | | | | | | |
| अ. | योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ब. | योग्य जोड्या जुळवा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| क. | खालील विधानांसाठी एक शब्द किंवा शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ड. | खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| इ. | गटात न बसणारा शब्द ओळखा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| फ. | खालील विधाने पूर्ण करा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ग. | कंसातील अचूक पर्याय निवडा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ह. | एका वाक्यात उत्तरे लिहा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ई. | खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ज. | योग्य क्रम लावा. | NA | ✓ | ✓ | NA | NA | NA | NA | ✓ |
| | खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| | खालील विधाने सकारण स्पष्ट करा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| | खालील घटना व परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |

**टीप:** वरील सर्व प्रश्नप्रकार पाठ्यपुस्तकात समाविष्ट आहेत.

Sample Content

# अनुक्रमणिका


| अनु. क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. (दीर्घोत्तरी प्रश्न) | पृष्ठ क्र. (वस्तुनिष्ठ प्रश्न) |
|---|---|---|---|
| १. | वाणिज्य व व्यवसायाची ओळख | १ | १२८ |
| २. | व्यापार | १५ | १३७ |
| ३. | लघुउद्योग व व्यवसाय | ३६ | १४७ |
| ४. | व्यवसाय संघटनांचे प्रकार भाग - १ | ४६ | १५३ |
| ५. | व्यवसाय संघटनांचे प्रकार भाग - २ | ७५ | १६३ |
| ६. | व्यवसाय सहायक संस्था | ९० | १७१ |
| ७. | व्यावसायिक पर्यावरण | १०५ | १८१ |
| ८. | व्यवस्थापनाची ओळख | ११७ | १९१ |


**टीप:** i. पाठाखाली दिलेले प्रश्न **(T)** या चिन्हाने दर्शवले आहेत.

ii. प्रत्येक पाठाच्या सुरुवातीला प्रश्नांची सारणी देण्यात आली आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना पाठाचा आढावा घेता येईल. तसेच, विद्यार्थ्यांनी प्रत्येक प्रश्नाचा किती वेळा अभ्यास केला ह्याची नोंद करण्याकरता प्रत्येक प्रश्नासमोर पहिले वाचन, दुसरे वाचन व तिसरे वाचन असे रकाने देण्यात आले आहेत.

Sample Content

# १ वाणिज्य व व्यवसायाची ओळख

| अनु.क्र. | तपशील | पहिले वाचन | दुसरे वाचन | तिसरे वाचन |
|---|---|---|---|---|
| १. | मानवी कृतींचे प्रकार सांगा. | | | |
| २. | व्यवसाय संज्ञेची व्याख्या द्या व वैशिष्ट्ये स्पष्ट करा. **(T)** | | | |
| ३. | व्यवसायाची कोणतीही चार वैशिष्ट्ये सांगा. **(T)** | | | |
| ४. | पेशाची कोणतीही चार वैशिष्ट्ये सांगा. **(T)** | | | |
| ५. | रोजगाराची चार वैशिष्ट्ये लिहा. **(T)** | | | |
| ६. | व्यवसायाची वेगवेगळी उद्दिष्टे स्पष्ट करा. **(T)** | | | |
| ७. | व्यवसायाची कोणतीही चार उद्दिष्टे लिहा. **(T)** | | | |
| ८. | व्यवसायातील नफ्याची भूमिका स्पष्ट करा. **(T)** | | | |
| ९. | व्यावसायिक कृतीचे प्रकार सांगा. **(T)** | | | |
| १०. | वाणिज्य म्हणजे काय? **(T)** | | | |
| ११. | उद्योगाचे कोणतेही दोन प्रकार सांगा. **(T)** | | | |
| १२. | प्राथमिक उद्योगाचे कोणतेही दोन प्रकार सांगा. **(T)** | | | |
| १३. | दुय्यम उद्योगाचे प्रकार कोणते? **(T)** | | | |
| १४. | व्यापार ही संकल्पना स्पष्ट करा. | | | |
| १५. | विदेशी व्यापाराचे दोन प्रकार सांगा. **(T)** | | | |
| १६. | निर्यात व्यापार म्हणजे काय? **(T)** | | | |
| १७. | अंतर्गत व्यापाराची व्याप्ती स्पष्ट करा. **(T)** | | | |
| १८. | व्यापाराच्या अनुषंगिक साधनांची व्यापारामधील भूमिका थोडक्यात स्पष्ट करा. **(T)** | | | |
| १९. | कोणतीही चार अनुषंगिक साधने स्पष्ट करा. **(T)** | | | |
| २०. | व्यापारासाठी बँक व विमा कशाप्रकारे उपयोगी असतात? **(T)** | | | |
| २१. | व्यवसाय, पेशा व नोकरी यांचा तुलनात्मक अभ्यास करा. **(T)** | | | |
| २२. | फरक स्पष्ट करा. **(T)**<br>अ. उद्योग व वाणिज्य ब. व्यवसाय व वाणिज्य<br>क. व्यवसाय व पेशा ड. नोकरी आणि पेशा | | | |

Sample Content


**प्रस्तावना**

सर्व मनुष्य स्वत:ला व्यस्त ठेवण्यासाठी काहीतरी कामामध्ये गुंतवून घेतात. ही कामे त्यांना पैसे कमवण्यात मदत करतात किंवा त्यांना समाधान देतात. उदाहरणार्थ, विद्यार्थी सुट्टीच्या काळात प्रशिक्षणार्थी म्हणून काम करून अनुभव व पैसे मिळवू शकतात. ते मित्रांसोबत बाहेरदेखील जाऊ शकतात, चित्रपट पाहू शकतात किंवा कुटुंबासोबत आपला वेळ घालवू शकतात. प्रशिक्षणार्थी म्हणून काम केल्याने त्यांना पैसे कमवण्यास मदत होते, तर इतर कामे ते समाधान आणि आनंदासाठी करतात. दोन्ही घटनांमध्ये इतर सर्व मानव ज्याप्रमाणे आयुष्यभर स्वत:ला व्यस्त ठेवतात त्याप्रमाणे विद्यार्थी सुट्टीमध्ये स्वत:ला व्यस्त ठेवतात.

## प्र. १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

### १. मानवी कृतींचे प्रकार सांगा.

**उत्तर:** सर्व मानव स्वत:ला व्यस्त ठेवून काही ना काही कृती संपूर्ण आयुष्यभर करत असतात. त्यांनी केलेल्या सर्व कृती आर्थिक आणि आर्थिकेतर कृतीमध्ये वर्गीकृत केल्या जातात.




१) **आर्थिकेतर कृती**

**अर्थ:** यामध्ये वैयक्तिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व भावनिक समाधान करणाऱ्या, पैशांची अपेक्षा न ठेवलेल्या कृतींचा समावेश होतो.

**उदा.** पुस्तके वाचणे, जनतेची सेवा करणे, आईने स्वयंपाक बनवणे इत्यादी.

२) **आर्थिक कृती**

**अर्थ:** समाजातील सर्व स्तरातून वस्तू व सेवा यांचे उत्पादन, वितरण आणि उपभोग इत्यादींशी संबंधित असलेल्या कृतींचा समावेश यामध्ये होतो. आर्थिक कृती रोजगार मिळवण्यास मदत करतात. सोप्या शब्दांत आर्थिक कृती पैसे मिळवण्यासाठी केल्या जातात.

**उदा.** कामगाराने कारखान्यात काम करणे, अधिकाऱ्याने बँकेत काम करणे.

## २. व्यवसाय संज्ञेची व्याख्या द्या व वैशिष्ट्ये स्पष्ट करा. (T)

**उत्तर:** व्यवसाय ही मानवाकडून केली जाणारी एक आर्थिक कृती आहे. व्यवसाय मानवांना उपजीविकेसाठी किंवा पैसे कमवण्यासाठी मदत करतो.

**अर्थ**

१) व्यवसाय हा एखाद्या व्यक्तीचे किंवा एखाद्या समूहाचे सुसंघटित प्रयत्न दर्शवतो.

२) वस्तू व सेवांचे उत्पादन करून आणि बाजारपेठेमध्ये त्यांची विक्री करून नफ्याच्या स्वरूपात मोबदला मिळवण्याचा व्यावसायिकाकडून केला जाणारा हा पद्धतशीर प्रयत्न असतो.

i. **उत्पादन:** याचा अर्थ वस्तू तयार करणे (उत्पादन) होय. वस्तू मानवी श्रमाच्या मदतीने किंवा यंत्राच्या मदतीने किंवा दोन्हींच्या मदतीने तयार केल्या जातात. या कृषी उत्पादने किंवा कारखान्यात तयार होणाऱ्या वस्तू असू शकतात. उदा. जमिनीची मशागत करून अन्नधान्याचे उत्पादन करणे हे कृषी उत्पादनाचे उदाहरण आहे, तर मानवी श्रम किंवा यंत्रांच्या साहाय्याने कारखान्यामधून तेलबियांचे रूपांतर खाद्य तेलात करणे हे औद्योगिक उत्पादनाचे उदाहरण आहे.

ii. **वितरण:** यामध्ये वस्तू व सेवा यांच्या वितरणाचा समावेश असतो. वितरणामध्ये वाहतूक, गोदाम, जाहिरात यांच्या मदतीने उत्पादकाकडून अंतिम ग्राहकाकडे त्या वस्तू हस्तांतरित केल्या जातात.

३) व्यवसाय समाजाच्या विविध प्रकारच्या गरजा भागवतो.

**व्याख्या**

१) प्रा. हॅने यांच्या मते, "मालाचे उत्पादन करण्याच्या व संपत्ती मिळवण्याच्या दिशेने केलेली सर्व मानवी कार्ये म्हणजे व्यवसाय होय."

२) प्रा. प्राईड, हग्ज, कपूर यांच्या मते, "समाजाच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी वस्तू आणि सेवांचे नफा मिळवण्याच्या दृष्टीने, उत्पादन व विक्रीसाठी व्यक्तींचे सामूहिक प्रयत्न म्हणजे व्यवसाय."

**व्यवसायाची वैशिष्ट्ये**

१) **आर्थिक कृती**

व्यवसाय ही एक आर्थिक कृती असून ती **अर्थप्राप्तीसाठी व उपजीविकेसाठी** केली जाते. दुसऱ्या शब्दांत ती प्रेमासाठी, आपुलकीसाठी किंवा करुणेसाठी केली जात नाही.

२) **दोन पक्ष**

प्रत्येक व्यवसायाच्या घडामोडीमध्ये देवाणघेवाण (वस्तू व सेवांची) केली जाते आणि त्यामध्ये **कमीत कमी दोन पक्षांची गरज असते.** हे पक्ष म्हणजेच ग्राहक व विक्रेता होय. खरेदीदार व विक्रेता यांच्यातील कराराचा परिणाम म्हणजे व्यवसायातील व्यवहार पूर्ण होणे होय. हे करार लेखी किंवा तोंडी असू शकतात.

३) **नफा हेतू**

कोणत्याही व्यवसायाचा मूळ उद्देश नफा मिळवणे हा असतो. व्यवसायात वस्तूंची मोठ्या प्रमाणावर विक्री करून किंवा खर्च थोड्याफार प्रमाणात कमी करून **जास्तीत जास्त नफा मिळवण्याचा प्रयत्न** व्यावसायिक करत असतो. नफा हा उद्योगाचा कणा असतो, ज्यामुळे व्यवसाय दीर्घकाळ चालू शकतो. नफा हा व्यवसायानुसार वेगवेगळा असतो.

Sample Content

**४) <u>वस्तू व सेवांचे उत्पादन</u>**

वस्तूंची किंवा सेवांची देवाणघेवाण करण्यापूर्वी व्यवसायांना त्या वस्तूंचे उत्पादन करावे लागते. दुसऱ्या शब्दांत, **वस्तू एकतर कारखान्यात मोठ्या प्रमाणावर निर्माण केल्या जातात किंवा व्यावसायिकाला उत्पादकाकडून त्या पुरवल्या जातात**. या वस्तूंची विक्री करून नफा मिळवणे हा यामागचा उद्देश असतो.

**५) <u>वस्तू व सेवांची देवाणघेवाण</u>**

i. व्यवसायामध्ये वस्तू व सेवांची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या पैशाच्या रूपात किंवा किमतीत देवाणघेवाण केली जाते.

ii. **मौद्रिक देवाणघेवाण** ही पैशाच्या बदल्यात वस्तू व सेवांची देवाणघेवाण असते. (उदा. पैशाच्या बदल्यात वह्या खरेदी करणे) तर **वस्तू विनिमयामध्ये** वस्तू व सेवांच्या बदल्यात इतर वस्तूंची देवाणघेवाण केली जाते. (उदा. गव्हाच्या बदल्यात तांदूळ घेणे)

iii. जर वस्तूचे उत्पादन स्वतःच्या उपभोगासाठी केले जात असेल. (उदा. स्वतःच्या मुलीसाठी पोशाख शिवणे) तर याला उद्योगधंदा म्हणता येणार नाही. जेव्हा वस्तूचे उत्पादन त्याची विक्री करून नफा मिळविण्यासाठी केले जाते तेव्हा ती व्यावसायिक कृती असते. (उदा. पोशाख शिंप्याच्या दुकानात शिवून त्याचे पैसे घेतले जात असतील.)

iv. तसेच, जर वस्तू दान केली किंवा भेट दिली, तर त्याला व्यवसाय म्हणता येत नाही. कारण ती पैशासाठी किंवा किमतीसाठी केलेली देवाणघेवाण नसते.

**६) <u>वस्तू व सेवांचा विनिमय</u>**

वस्तू व सेवांच्या शिवाय व्यवसाय होऊ शकत नाही. दुसऱ्या शब्दांत प्रत्येक व्यवसाय प्रकारातील व्यवहार हे **वस्तू किंवा सेवा यांच्याशी संबंधित असतात.** या वस्तू एकतर उपभोग्य वस्तू (उदा. चहा, दूध, फर्निचर) किंवा भांडवली वस्तू (उदा. यंत्रसामग्री, फर्निचर इत्यादी) असतात. व्यवसायाचे व्यवहार हे एखाद्या व्यक्तीशी (ब ते क) किंवा दुसऱ्या व्यवसायाशी (ब ते ब) होऊ शकतात.

**७) <u>व्यवसाय सातत्य</u>**

प्रत्येक **व्यवसायात नियमितपणे व्यवहार** होत असतात. जर केवळ एकच व्यवहार केला तर त्याला व्यवसाय म्हणता येत नाही. उदा. जर एखाद्याने त्याची स्वतःची गाडी विकून नफा मिळवला, तर त्याला व्यवसाय कृती म्हणता येत नाही; परंतु ती व्यक्ती नियमितपणे मोटारींची खरेदी-विक्री करत असेल, तर त्याला व्यवसाय (व्यवहारातील सातत्य) मानले जाते.

**८) <u>अनिश्चित परतावा</u>**

व्यवसायात नफ्याचा अंदाज घेता येत नाही किंवा त्याची हमी देता येत नाही. व्यावसायिकांना **कधी नफा मिळतो किंवा काही वेळा नुकसान** सहन करावे लागते. त्यामुळे, व्यवसायातील परतावा हा नेहमी अनिश्चित स्वरूपाचा असतो.

**९) <u>जोखीम/धोका</u>**

जोखीम किंवा धोका हा प्रत्येक व्यवसायातील महत्त्वाचा घटक आहे. **अनपेक्षित किंवा परिस्थितीजन्य घटनांमुळे प्रत्येक व्यवसायात जोखमेची तीव्रता कमी-अधिक असते**. यातील काही घटक टाळणे व्यावसायिकाच्या हातात नसते. उदा. ग्राहकांच्या रुचीतील बदल, ग्राहकांची आवड/नावड, फॅशन्स, उत्पादनाच्या पद्धतीतील बदल, आग, चोरी, नैसर्गिक आपत्ती, सरकारी धोरण इत्यादी. कोणताही व्यवसाय या धोक्यांपासून / घटकांपासून मुक्त नाही. धोक्याची तीव्रता कमी करता येऊ शकते, मात्र तो ते पूर्णपणे टाळता येऊ शकत नाही.



**ज्ञानगुरू**

जेव्हा महाराष्ट्र सराकारने प्लॅस्टिक बंदी लागू केली तेव्हा महाराष्ट्रातील अनेक प्लॅस्टिक व्यापारी व उत्पादकांना आपला व्यवसाय त्वरित बंद करावा लागला.

**१०) <u>उपभोक्त्यांचे किंवा ग्राहकांचे समाधान</u>**

ग्राहकांचे समाधान हे सर्व आर्थिक उपक्रमांचे अंतिम ध्येय असते आणि कोणताही व्यवसाय त्याला अपवाद नसतो. माफक किमतीमध्ये दर्जेदार वस्तू आणि सेवांचा पुरवठा करून **ग्राहकांचे समाधान करण्यावर आधुनिक व्यवसाय भर देतो**. सोप्या शब्दांत, व्यवसायाचा उद्देश ग्राहक निर्माण करणे व टिकवून ठेवणे हा असतो.

**३. व्यवसायाची कोणतीही चार वैशिष्ट्ये सांगा.** (T)

**उत्तर:** प्र. क्र. १ - २ अभ्यासा. (कोणतीही चार वैशिष्ट्ये)

Sample Content

## ४. पेशाची कोणतीही चार वैशिष्ट्ये सांगा.

**उत्तर:** पेशा ही मानवाद्वारे केली जाणारी एक आर्थिक कृती आहे.

**अर्थ**

१) पेशा हा आर्थिक कृतींचा असा भाग आहे, की ज्यामध्ये व्यक्ती त्यांचे शैक्षणिक ज्ञान व विशेष कौशल्ये वापरून उत्पन्न मिळवण्याच्या हेतूने सेवा पुरवत असतात.

२) उदा. डॉक्टर, वकील, सनदी लेखापाल इत्यादी त्यांचे ज्ञान आणि कौशल्य वापरून ग्राहकांना सेवा पुरवतात आणि त्या बदल्यात फी (पैसे) कमावतात.

**पेशाची वैशिष्ट्ये**

१) **उद्देश**

प्रत्येक पेशा हा **पैसा मिळवण्यासाठी** केला जातो. डॉक्टर किंवा वकील ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांना सेवा पुरवतात. त्याच्या बदल्यात फीच्या स्वरूपात त्यांना आर्थिक मोबदला मिळतो.

२) **पात्रता**

कोणताही पेशा व्यक्तीने **विशिष्ट प्रकारची पात्रता धारण केल्यावरच** स्वीकारता येतो. प्रत्येक पेशात विशिष्ट ज्ञान समुच्चयाचा समावेश असतो. कोणतीही व्यक्ती त्या पेशाचे ज्ञान घेतल्याशिवाय पेशा चालवू शकत नाही. हे ज्ञान पद्धतशीर व औपचारिक प्रशिक्षणाद्वारेच घ्यावे लागते.

३) **आर्थिक मोबदला**

**पेशामध्ये पैशाच्या मोबदल्यात सेवा दिली जाते**. या मोबदल्याला व्यावसायिक शुल्क (फी) म्हणतात. पेशामध्ये मिळणारे उत्पन्न स्थिर नसते. पेशा करणारी व्यक्ती व्यवसाय संघटनांमध्ये काम करणारी कर्मचारी किंवा स्वयंरोजगार करणारी असते. जसे, नोकरी करणाऱ्या सनदी लेखापालाला पगार मिळतो तर जे खाजगी काम म्हणजेच स्वयंरोजगारात असतात त्यांना फीच्या स्वरूपात मोबदला मिळतो.

**ज्ञानात भर**

सॅम हा सनदी लेखापाल आहे. तो रिलायन्स कॅपिटल लिमिटेडमध्ये काम करतो आणि त्याने कंपनीला दिलेल्या सेवांच्या बदल्यात त्याला दरमहा निश्चित पगार मिळतो. त्याचा मित्र जॉन हा देखील सीए आहे, तो खाजगी काम करतो. त्याचे ग्राहक वेळोवेळी बदलतात. म्हणूनच, त्याच्या सर्व ग्राहकांकडून त्याला मिळणारी एकूण फी देखील वेळेनुसार बदलते. म्हणूनच, जॉनचे उत्पन्न निश्चित नाही.

४) **भांडवल**

पेशा स्वीकारलेली व्यक्ती **स्वतंत्रपणे काम करते** किंवा **एखाद्याच्या अंतर्गत काम स्वीकारू शकते**. स्वतंत्रपणे काम करणाऱ्या व्यक्तीला पेशामध्ये स्थिरस्थावर होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवावे लागते. ते **प्रत्येक पेशात वेगवेगळे** असते. उदा. एखाद्या डॉक्टरला स्वत:चा व्यवसाय सुरू करायचा असेल, तर त्याला आपल्या दवाखान्याची जागा विकत घेण्यासाठी/भाड्याने घेण्यासाठी, पायाभूत सुविधा आणि फर्निचर, उपकरणे इत्यादींसाठी गुंतवणूक करावी लागेल.

५) **नोंदणी व सभासद**

प्रत्येक पेशाची राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र संघटना असते, जी पेशाशी संबंधित व्यक्तींच्या पेशाबाबत नियम बनवते. (उदा. वकिलांसाठी बार कौन्सिल ऑफ इंडिया, सनदी लेखापालांसाठी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ऑफ इंडिया (ICAI), डॉक्टर्ससाठी इंडियन मेडिकल असोसिएशन इत्यादी). **पेशा स्वीकारणाऱ्याला संबंधित संघटनेत नोंदणी करावी लागते आणि व्यवसायाकरता प्रमाणपत्र घ्यावे लागते**. पेशा म्हणून काम करणाऱ्यांना संबंधित संघटनेने तयार केलेल्या नियमावलींचे पालन करावे लागते. **प्रत्येक पेशा स्वीकारणाऱ्याला संबंधित संघटनेचे सभासदत्व घ्यावेच लागते.**

६) **अ-हस्तांतरणीय**

कोणताही पेशा करणारा आपल्या इच्छेनुसार पेशा दुसऱ्याला हस्तांतरित करू शकत नाही. उदा. डॉक्टर आपला दवाखाना वैद्यकीय शिक्षण न घेतलेल्या मुलाकडे हस्तांतरित करू शकत नाहीत.

७) **कामाचे स्वरूप**

पेशामध्ये त्यांच्या क्षेत्रात विशेष सेवा दिल्यानंतर त्या बदल्यात शुल्क किंवा फी आकारली जाते. **विशिष्ट पेशातील शैक्षणिक ज्ञान व विशेष कौशल्य यावर कामाचे स्वरूप अवलंबून असते.** उदा. स्थापत्यशास्त्रात इमारतीच्या बांधकामाचा नकाशा शुल्क किंवा फी घेऊन तयार करून दिला जातो.

Sample Content

## ५. रोजगाराची चार वैशिष्ट्ये लिहा. (T)

**उत्तर:** रोजगार (नोकरी) ही मानवाद्वारे केली जाणारी एक आर्थिक कृती आहे. तो उपजीविकेसाठी किंवा उत्पन्न मिळवण्यासाठी केला जातो.

**अर्थ:**

१) रोजगार (नोकरी) ही एक आर्थिक क्रिया असून यामध्ये कर्मचारी इतरांसाठी काम करतात.

२) या आर्थिक कृतीमध्ये मालक व कामगार असे नाते असते.

३) मालक म्हणजे अशी व्यक्ती, जी दुसऱ्याला कामाची संधी देते.

४) कर्मचारी (कामगार) म्हणजे कामाची संधी घेणारी व्यक्ती होय.

५) कामाचा मोबदला व कामाच्या अटी यांबाबत दोघांमध्ये करार झालेला असतो.

**रोजगाराची (नोकरीची) वैशिष्ट्ये**

१) **उद्देश**

स्वत:च्या गरजा पूर्ण करण्यासाठी **पैसा मिळवणे** हा कर्मचाऱ्याचा नोकरी करण्यामागील हेतू असतो.

**ज्ञानात भर**

समजा, रीना ही एक उद्योजक आहे. तिने बुटीक उघडले आहे. तिने आपल्या बुटीकमध्ये दोन टेलर, तीन विक्रेत्या मुली आणि एक रोखपाल कर्मचारी म्हणून ठेवले आहेत. डिझायनर कपडे विकून पैसे कमवण्याचे रीनाचे ध्येय आहे. त्याचवेळी, ती तिच्या सर्व कर्मचाऱ्यांना (त्यांनी प्रदान केलेल्या सेवांसाठी) पगार देते, ज्यामुळे कर्मचारी त्यांच्या गरजा भागवू शकतात.

२) **पात्रता**

**प्रत्येक नोकरीत पात्रतेची गरज असते.** कामाच्या स्वरूपाप्रमाणे कुशल अथवा अकुशल कामगारांची गरज असते. कौशल्याचे काम असेल, तर त्यासाठी विशिष्ट पात्रतेची गरज असते. उदा. परिचारिकेची (नर्सची) नोकरी करण्यासाठी नर्सिंगचा कोर्स करणे आवश्यक असते. याउलट अकुशल कामासाठी विशिष्ट पात्रतेची आवश्यकता नसते. उदा. कार्यालयीन सेवक म्हणून काम करण्यासाठी विशिष्ट पात्रतेची अथवा कोणताही कोर्स करण्याची गरज नसते.

३) **आर्थिक मोबदला**

कामगाराने विशिष्ट वेळेत पूर्ण केलेल्या कामाचा मोबदला आर्थिक स्वरूपात **पगार किंवा मजुरी** म्हणून दिला जातो. मजुरी रोज, आठवड्याला किंवा महिन्याला दिली जाते. पगार महिन्याला दिला जातो. कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यापूर्वीच हा आर्थिक मोबदला ठरवण्यात येतो. याव्यतिरिक्त कर्मचाऱ्यांना बोनस, भत्ते, निवास व्यवस्था व इतर सेवांचा लाभ दिला जातो.

४) **भांडवल**

मालक नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्याला काम करण्यासाठी सर्व सोयी उपलब्ध करून देतो. त्यामुळे, नोकरी करण्यासाठी कामगारांना **भांडवलाची आवश्यकता नसते**. ते मालकाने पूर्णपणे गुंतवलेले असते.

५) **नोंदणी**

नोकरीसाठी **नोंदणीची गरज नसते**. नोकरदाराने नोकरी करताना मालकाबरोबर झालेल्या करारानुसार नोकरीच्या नियम व अटींचे पालन करणे आवश्यक असते.

६) **अ-हस्तांतरणीय**

कोणतीही नोकरी एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे **हस्तांतरित करता येत नाही.** उदा. जर एखादा शिक्षक निवृत्त झाला तर त्याला त्याच्या जागी आपल्या मुलाला किंवा मुलीला नोकरी हस्तांतरित करता येत नाही.

७) **कामाचे स्वरूप**

कर्मचाऱ्याच्या कामाचे स्वरूप हे **त्याच्या मालकाच्या कामाच्या स्वरूपावर अवलंबून असते**. या आर्थिक कृतीमध्ये प्रत्येक कर्मचाऱ्यास नेमून दिलेले काम त्याने पूर्ण करणे अपेक्षित असते.

## ६. व्यवसायाची वेगवेगळी उद्दिष्टे स्पष्ट करा. (T)

**उत्तर:** व्यवसाय हा एखाद्या व्यक्तीचे किंवा एखाद्या समूहाचे सुसंघटित प्रयत्न दर्शवतो. व्यावसायिकाकडून वस्तू व सेवांचे उत्पादन करून आणि बाजारपेठेमध्ये त्यांची विक्री करून नफ्याच्या स्वरूपात मोबदला मिळवण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला जातो. सर्व व्यावसायिक कृतींना व्यवसायाची उद्दिष्टे मार्गदर्शक ठरतात. ही विविध उद्दिष्टे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येऊ शकतात.

Sample Content

**आर्थिक उद्‌दिष्टे**

१) **नफा मिळवणे**

सर्व व्यावसायिक कृती ह्या नफा मिळवण्यासाठी केल्या जातात. नफा म्हणजे खर्चापेक्षा महसुली उत्पन्न अधिक असणे. व्यवसायाच्या स्थिरतेसाठी व वाढीसाठी नफा आवश्यक असतो.



**ज्ञानगुरू**

रिलायन्स उद्योगाने २०१८-१९ या वर्षासाठी ₹३९,००० कोटींपेक्षा जास्त नफा कमावला. टाटा कम्युनिकेशन सर्व्हिसेसने (TCS) सुद्धा याच काळात ₹३१,००० कोटींपेक्षा जास्त नफा कमावला.

२) **नवीन ग्राहक शोधणे**

व्यावसायिक संघटनांना नवीन ग्राहक मिळवण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात. यातूनच त्यांची विक्री वाढते. प्रस्थापित ग्राहक टिकवून ठेवणे हे देखील संघटनांचे उद्‌दिष्ट असते.

३) **नावीन्यपूर्ण उपक्रम**

नवकल्पना म्हणजे उत्पादन किंवा उत्पादन प्रक्रियेमध्ये विकास किंवा सकारात्मक बदल होय. व्यावसायिक संघटनांना संशोधन व विकास, बाजार सर्व्हेक्षण, नवीन तंत्रज्ञानाचा वापर इत्यादींसाठी पैसे खर्च करावे लागतात. नवकल्पनांमुळे उत्पादनात किंवा उत्पादन प्रक्रियेमध्ये सुधारणा होते व संघटनेच्या वाढीस हातभार लागतो.

४) **उपलब्ध साधनांचा सुयोग्य वापर**

उपलब्ध साधने दुर्मीळ असतात आणि त्यांचा पर्यायी वापर असतो. म्हणूनच, अपव्यय टाळण्यासाठी सदर साधनांचा सुयोग्य आणि जास्तीत जास्त वापर आवश्यक ठरतो. साधनांचा सुयोग्य वापर अधिक नफा मिळवण्यात योगदान देतो.

**सामाजिक उद्‌दिष्टे**

१) **दर्जेदार उत्पादनांचा पुरवठा करणे**

प्रत्येक व्यवसायाने ग्राहकांना दर्जेदार वस्तूंचा पुरवठा करणे आवश्यक असते. वस्तूचा दर्जा म्हणजे वस्तूची शुद्‌धता, सुरक्षितता, टिकाऊपणा, उपयोगिता इत्यादी. वस्तूंचा चांगला दर्जा ग्राहकांच्या मनात विश्वास निर्माण करतो.

२) **व्यापारातील गैरव्यवहार टाळणे**

काळाबाजार, फसव्या जाहिराती, चुकीची वजनमापे इत्यादी गोष्टी म्हणजे व्यापारातील गैरव्यवहार होत. व्यवसायात टिकून राहण्यासाठी व व्यवसाय वाढीसाठी व्यावसायिकांनी अशा गोष्टी टाळणे आवश्यक आहे.

३) **रोजगार निर्मिती**

व्यवसाय ही सामाजिक व आर्थिक संस्था आहे. त्यामुळे, कुशल व अकुशल मनुष्यबळांसाठी नोकरीच्या संधी त्याने निर्माण केल्या पाहिजेत. आर्थिकदृष्ट्या मागास व दिव्यांग व्यक्तींना व्यवसायाने नोकरीची संधी दिली पाहिजे.

४) **कर्मचारी कल्याण**

व्यवसायाने कर्मचाऱ्यांना योग्य व नियमित मोबदला, कामाच्या ठिकाणी सुविधा, नि:पक्षपाती धोरण व पगाराव्यतिरिक्त इतर मोबदले देणे आवश्यक आहे. कुशल व अकुशल कर्मचारी हा समाजाचा भाग आहे. त्यामुळे जर कामगारांची काळजी घेतली तर आपोआपच समाजाचे कल्याण होईल.


५) **सामाजिक प्रश्न सोडवण्यास मदत करणे**

वाढत्या औद्योगिकीकरणामुळे वाहतुकीची कोंडी, वाढती झोपडपट्टी, हवा व पाणी प्रदूषण इत्यादी अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होत आहेत. व्यवसायाने या प्रश्नांबाबत जागरूक राहून हे प्रश्न कमी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

६) **सामाजिक कल्याणात सहभाग**

व्यावसायिकांनी समाजाच्या सर्वसाधारण कल्याणाची काळजी घेतली पाहिजे. यासाठी आवश्यक तेथे देणग्या, उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणे इत्यादी आवश्यक आहे.

Sample Content



**ज्ञानगुरू**

२०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये टाटा स्टीलने जवळपास ₹३.१५ अब्ज व्यावसायिक सामाजिक जबाबदारीसाठी (CSR) खर्च केले.

**[टीप:** टाटा स्टीलच्या CSR उपक्रमावरील व्हिडिओ पाहण्यासाठी सोबत दिलेला Q. R. Code स्कॅन करा.**]**

### ७. व्यवसायाची कोणतीही चार उद्दिष्टे लिहा. (T)

**उत्तर:** प्र. क्र. १ - ६ अभ्यासा. (कोणतीही चार उद्दिष्टे)

### ८. व्यवसायातील नफ्याची भूमिका स्पष्ट करा. (T)

**उत्तर:** व्यवसाय हा एखाद्या व्यक्तीचे किंवा एखाद्या समूहाचे सुसंघटित प्रयत्न दर्शवतो. व्यावसायिकाकडून वस्तू व सेवांचे उत्पादन करून आणि बाजारपेठेमध्ये त्यांची विक्री करून नफ्याच्या स्वरूपात मोबदला मिळवण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला जातो. **नफा म्हणजे खर्चापेक्षा महसुली उत्पन्न अधिक असणे होय**. प्रत्येक व्यवसाय हा नफा मिळवण्यासाठी केला जातो.

| नफा = उत्पन्न – एकूण खर्च |
|---|

व्यवसायातील नफ्याची भूमिका पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते:

१) **गुंतवणूकदारांना परतावा**
ज्या व्यक्ती व्यवसायात भांडवल गुंतवणूक करतात त्यांना गुंतवणुकीवर परतावा अपेक्षित असतो. व्यवसायाला चांगला नफा झाला तरच हे शक्य असते. सोप्या शब्दांत, गुंतवणूकदाराला चांगला परतावा मिळणे नफ्यावर अवलंबून असते.

२) **संशोधन व विकास**
पुरेसा नफा असेल, तर उद्योग संशोधन व विकासासाठी खर्च करू शकतो. यामुळे चांगले तंत्रज्ञान मिळू शकते व उत्पादन खर्च कमी होऊ शकतो. अशाप्रकारे नावीन्यपूर्ण उत्पादन केल्यामुळे संपूर्ण राष्ट्राला लाभ होतो.

३) **वाढ व विस्तार**
नफा हा अंतर्गत स्रोत आहे. व्यवसायाद्वारे नफ्याचा वापर पुनर्गुंतवणुकीसाठी व विविधतेसाठी करून व्यवसायाचा विस्तार व वाढ केली जाऊ शकते. याचा व्यवसायाच्या पुढील विकासास हातभार लागतो.

४) **कार्यक्षमतेत वाढ**
नफ्यामुळे व्यवसायाला कामगारांचे वेतन व वेगवेगळी देणी वेळेत देता येतात. यामुळे, संस्थेमध्ये काम करणाऱ्या कामगारांना प्रेरणा मिळते. यामुळे संपूर्ण संस्थेची कार्यक्षमता वाढते.

५) **उदरनिर्वाहाचे साधन**
व्यवसायात मिळवलेल्या नफ्याचा उपयोग व्यावसायिक उदरनिर्वाहाचे साधन म्हणून करतो. पुरेसा नफा मिळवल्यामुळे त्यांच्या विविध गरजा पूर्ण होतात आणि जीवनमानाचा दर्जा उंचावतो.

६) **धोका पत्करण्याचे फळ**
व्यवसायात व्यावसायिकाने स्वीकारलेल्या धोक्याबद्दलचे बक्षिस म्हणजे नफा होय. ज्या धोक्यांचा विमा उतरवता येत नाही त्यांचा मोबदला म्हणजे नफा असतो. उदा. प्रतिकूल सरकारी धोरण, मागणीत घट होणे इत्यादी.

७) **व्यवसायात टिकून राहणे**
स्पर्धेच्या बाजारात टिकून राहण्यासाठी नफा व्यवसायाला मदत करतो. उदा. नफा मिळवणारा व्यवसाय संशोधन व विकासात अधिक गुंतवणूक करू शकतो, नावीन्यपूर्ण उत्पादने तयार करू शकतो. चांगले कामगार कामावर ठेवू शकतो, उत्पादनांची चांगली विक्री करू शकतो, इत्यादी. हे सर्व उद्योगांना प्रतिस्पर्ध्यांवर मात करण्यास सक्षम करते. व्यवसायात पुरेसा नफा मिळत नसेल तर स्पर्धेच्या बाजारपेठेत टिकून राहता येत नाही.


Sample Content

## ९. व्यावसायिक कृतीचे प्रकार सांगा. T

**उत्तर:** व्यवसाय हा एखाद्या व्यक्तीचे किंवा एखाद्या समूहाचे सुसंघटित प्रयत्न दर्शवतो. व्यावसायिकाकडून वस्तू व सेवांचे उत्पादन करून आणि बाजारपेठेमध्ये त्यांची विक्री करून नफ्याच्या स्वरूपात मोबदला मिळवण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला जातो.

**<u>व्यवसायाच्या कृतींचे वर्गीकरण</u>**

**टीप:** खालील तक्ता लक्षात ठेवल्यामुळे वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या उत्तरांसाठी तसेच उर्वरित पाठाच्या उत्तम आकलनासाठी मदत होऊ शकते.




व्यवसायाच्या कृतींचे मुख्यत: दोन गटांत वर्गीकरण करता येते, ते म्हणजे उद्योग आणि वाणिज्य. उद्योग हा वस्तूंच्या उत्पादनाशी आणि सेवा पुरवण्याशी संबंधित आहे, तर वाणिज्य हे त्यांच्या वितरणाशी संबंधित आहे. या दोन्ही प्रकारांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येते.

**१) <u>उद्योग</u>**

**अर्थ:** उद्योग ही संकल्पना दोन प्रकारे स्पष्ट करता येऊ शकते:

i. उद्योग ही अशी आर्थिक कृती आहे ज्यामध्ये **कच्च्या मालावर प्रक्रिया करून त्याचे वापरायोग्य वस्तूत रूपांतर केले जाते**. उदा. वस्तूचे उत्पादन आणि प्रक्रिया, उत्खनन, बांधकाम इत्यादी. उत्पादित केलेल्या वस्तू ग्राहकोपयोगी (थेट ग्राहकाद्वारे वापरल्या जाणाऱ्या) किंवा भांडवली (उद्योगांच्या पुढील उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या) असू शकतात.

ii. उद्योग म्हणजे एकाच प्रकारच्या किंवा संबंधित वस्तूंचे उत्पादन करणारा समूह होय. उदा. साखर उद्योगात उसापासून साखर बनवणाऱ्या सर्व कारखान्यांचा समावेश होतो.

**स्थान:** औद्योगिक कार्ये ही कारखान्यातून किंवा काही वेळा घरातून सुद्धा चालतात. हे सर्व उद्योगाच्या आकारमानावर अवलंबून आहे.

**उपयोगिता:** उद्योगामुळे रूप उपयोगिता निर्माण होते. यामध्ये कच्च्या मालाचे रूपांतर वापरायोग्य पक्क्या मालात केले जाते. हे सर्व मानवी श्रम, यंत्रे व भांडवलामुळे शक्य होते.

**टीप:** रूप उपयोगिता ही वस्तूचे भौतिक स्वरूप बदलून निर्माण केलेली उपयोगिता असते.

उद्योगांची पुढील तीन प्रमुख गटांत विभागणी करता येते: प्राथमिक उद्योग, दुयम उद्योग व सेवा उद्योग. या उद्योगांची पुढे विविध प्रकारांत विभागणी करता येते.

**२) <u>वाणिज्य</u>**

**अर्थ:** वाणिज्य हा व्यावसायिक कृतीचा असा घटक आहे, **जो उद्योगांनी निर्माण केलेल्या वस्तू व सेवांचे वितरण करतो**. यामध्ये वस्तूंचे वितरण सुलभपणे व अविरतपणे पुरवणाऱ्या सर्व उपक्रमांचा समावेश होतो.

**उपयोगिता:** पैसा व पैशाचे मूल्य यांच्या मोबदल्यात वस्तू आणि सेवा यांची देवाणघेवाण करून उत्पादक व ग्राहक यांच्यामधील सेतू म्हणून वाणिज्य काम करते.

**घटक:** वाणिज्याचे व्यापार व व्यापार अनुषंगिक साधने असे दोन प्रकार पडतात. व्यापाराचे पुढे अंतर्गत व्यापार किंवा आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या आधारावर विविध प्रकार पडतात.

Sample Content

**१०. वाणिज्य म्हणजे काय?** (T)

**उत्तर:** प्र. क्र. १ - ९ मधील मुद्दा क्र. २ अभ्यासा.

**११. उद्योगाचे कोणतेही दोन प्रकार सांगा.** (T)

**उत्तर:** व्यावसायिक कृती मुख्यत: दोन मोठ्या गटांत वर्गीकृत करता येतात, ते म्हणजे उद्योग आणि वाणिज्य. उद्योग हा वस्तूंचे उत्पादन व सेवांचा पुरवठा यांच्याशी संबंधित आहे. उद्योगाचे तीन प्रमुख गट आहेत. ते पुढीलप्रमाणे:

१) **प्राथमिक उद्योग**

हे **निसर्गावर अवलंबून** असतात.हे **निसर्गाभिमुख** उद्योग आहेत. प्राथमिक उद्योगातील उत्पादने ही दुय्यम उद्योगासाठी वापरली जातात. प्राथमिक उद्योगाचे पुढील तीन प्रकार आहेत:

i. **कृषी उद्योग:** यामध्ये शेती उद्योगाचा समावेश होतो. या उद्योगातील वस्तूंचा दर्जा हा जमिनीची उत्पादकता, पाऊस, हवामान इत्यादी विविध घटकांवर अवलंबून असतो.

ii. **उत्खनन उद्योग:** यामध्ये निसर्गात असलेली संपत्ती प्रयत्नपूर्वक बाहेर काढली जाते. उदा. जमिनीखालून तेल व खनिजे बाहेर काढणे, मासेमारी इत्यादी. साधारणपणे हा माल कच्च्या स्वरूपात असतो. काही वेळा तो माल जसाच्या तसा वापरता येतो, तर काही वेळा त्यावर प्रक्रिया करावी लागते.

iii. **जैविक उद्योग:** जैविक उद्योगामध्ये रोपे व प्राण्यांच्या पुनरुत्पादन प्रक्रियेचा समावेश होतो. उदा. पशुसंवर्धन, रेशीम उद्योग, रोपवाटिका, वनशेती, इत्यादी.

२) **दुय्यम उद्योग**

हे उद्योग **प्राथमिक उद्योगाने पुरवलेल्या कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर करतात**. त्यामुळे ते प्राथमिक उद्योगांवर अवलंबून असतात. उदा. प्राथमिक उद्योगाने पुरवलेल्या टॉमॅटोचे दुय्यम उद्योग सॉस (रस) आणि केचअप तयार करतात. दुय्यम उद्योग दोन प्रकारचे असून ते पुढीलप्रमाणे आहेत:

i. **उत्पादन उद्योग:** यामध्ये प्राथमिक उद्योगाने पुरवलेल्या कच्च्या मालाचे मनुष्यबळाच्या व यंत्राच्या मदतीने पक्क्या मालात रूपांतर केले जाते. अंतिम उत्पादन हे भांडवली वस्तू किंवा गृहोपयोगी वस्तू असू शकते. उदा. कापड, साखर, कागद उद्योग इत्यादी.

ii. **बांधकाम उद्योग:** यामध्ये इमारत, धरणे, पूल, रस्ते, बोगदे, कालवे, मेट्रो इत्यादी तयार करणाऱ्या उद्योगांचा समावेश होतो. बांधकाम उद्योग अचल संपत्ती निर्माण करतात. म्हणजे, त्यामध्ये वस्तू उत्पादन व विक्री एकाच ठिकाणी केली जाते. इतर उद्योगांत वस्तूचे उत्पादन एका ठिकाणी व विक्री दुसऱ्या ठिकाणी करणे शक्य असते.

३) **सेवा उद्योग**

हे उद्योग **प्राथमिक व दुय्यम उद्योगांना सेवा पुरवतात**. सोप्या शब्दांत सेवा उद्योग इतर उद्योगांना विविध सेवा सुविधा पुरवतात. यामध्ये वाहतूक, विमा, बँकिंग इत्यादी पारंपरिक आणि पर्यटन उद्योग, उपहारगृहे, निवास उद्योग, मनोरंजन उद्योग इत्यादी आधुनिक प्रकारांचा समावेश होतो.

### झटपट उजळणी

**उद्योग:** वस्तूंचे उत्पादन व सेवा पुरवठा यांच्याशी संबंधित. रूप उपयोगिता निर्माण करतात.

**उद्योगांचे प्रकार**

१) **प्राथमिक उद्योग (निसर्गाभिमुख उद्योग)**
- i. कृषी उद्योग: शेती व लागवड उपक्रम
- ii. उत्खनन उद्योग: नैसर्गिक स्रोतांमधून संपत्ती बाहेर काढणे
- iii. जैविक उद्योग: रोपे आणि प्राणी यांचे पुनरुत्पादन

२) **दुय्यम उद्योग (कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर)**
- i. उत्पादन उद्योग: मनुष्यबळ व यंत्राच्या साहाय्याने प्राथमिक उद्योगाने पुरवलेल्या कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर.
- ii. बांधकाम उद्योग: इमारती, धरणे, पूल, रोड इत्यादी बांधणे. ते अचल संपत्ती निर्माण करतात.

३) **सेवा उद्योग (प्राथमिक व दुय्यम उद्योगांना सेवा प्रदान करतात)**

उदा. वाहतूक, बँकिंग, हॉटेल उद्योग, पर्यटन उद्योग, मनोरंजन उद्योग इत्यादी.

Sample Content

### १२. प्राथमिक उद्योगाचे कोणतेही दोन प्रकार सांगा. (T)

**उत्तर:** प्र. क्र. १ - ११ मधील मुद्दा क्र. १ अभ्यासा. (कोणतेही दोन प्रकार)

### १३. दुय्यम उद्योगाचे प्रकार कोणते? (T)

**उत्तर:** प्र. क्र. १ - ११ मधील मुद्दा क्र. २ अभ्यासा.

### १४. व्यापार ही संकल्पना स्पष्ट करा.

**उत्तर:** वाणिज्य हा व्यावसायिक कृतीचा असा घटक आहे, जो उद्योगांनी निर्माण केलेल्या वस्तू व सेवांचे वितरण करतो. वाणिज्याचे व्यापार व व्यापार अनुषंगिक साधने असे दोन प्रकार पडतात.

**व्यापाराचा अर्थ**

पैसे किंवा पैशाचे मूल्य यांच्या मोबदल्यात वस्तू आणि सेवांचा विनिमय म्हणजे व्यापार होय. दुसऱ्या शब्दांत व्यापार म्हणजे वस्तू व सेवांची खरेदी विक्री होय. व्यापारामुळे वस्तू आणि सेवांची मालकी व ताबा विक्रेत्याकडून खरेदीदाराकडे हस्तांतरित होतो. व्यापार ग्राहकांना वस्तू वेगवेगळ्या बाजारपेठेत उपलब्ध करून देतो.

**व्यापाराचे वर्गीकरण**

व्यापाराचे देशी/अंतर्गत व्यापार आणि विदेशी/आंतरराष्ट्रीय व्यापार असे वर्गीकरण केले जाते. ह्याची पुढे विविध प्रकारांत विभागणी केली जाते. व्यापाराचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे स्पष्ट केले जाऊ शकते.

१) **अंतर्गत व्यापार**

जेव्हा व्यापार (वस्तू व सेवांची खरेदी विक्री) देशांच्या **भौगोलिक सीमांतर्गत** केला जातो तेव्हा त्याला अंतर्गत व्यापार म्हणतात. या व्यापारासाठी देशी चलन वापरले जाते. यामध्ये पुढील प्रकारांचा समावेश होतो.

i. **घाऊक व्यापार:** घाऊक व्यापारात वस्तू व सेवा मोठ्या प्रमाणात खरेदी व विक्री केल्या जातात. घाऊक व्यापारी उत्पादकाकडून मोठ्या प्रमाणावर मालाची खरेदी करतात आणि किरकोळ व्यापाऱ्यांना लहान प्रमाणात विक्री करतात. घाऊक व्यापारी हा उत्पादक व किरकोळ विक्रेता यांच्यातील दुवा आहे.

ii. **किरकोळ व्यापार:** यात अंतिम ग्राहकास लहान प्रमाणावर विक्री केली जाते. जो व्यापारी घाऊक व्यापाऱ्याकडून (किंवा काही वेळेस प्रत्यक्ष उत्पादकाकडून) वस्तू खरेदी करतो आणि अंतिम ग्राहकास लहान प्रमाणावर विक्री करतो, त्यास किरकोळ व्यापारी असे म्हणतात. किरकोळ व्यापारी हा घाऊक व्यापारी (काहीवेळेस उत्पादक) व उपभोक्ता (ग्राहक) यांतील दुवा आहे.

२) **आंतरराष्ट्रीय व्यापार/ विदेशी व्यापार**

**दोन किंवा अधिक देशांमध्ये चालणाऱ्या व्यापारास** विदेशी व्यापार म्हणतात. या व्यापारात विदेशी चलनाचा वापर होतो. याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले जाते.

i. **आयात व्यापार:** जेव्हा वस्तू किंवा सेवा दुसऱ्या देशाकडून खरेदी केल्या जातात तेव्हा त्यास आयात व्यापार म्हणतात. उदा. भारत सौदी अरेबिया कडून कच्चे तेल आयात (खरेदी) करतो.

ii. **निर्यात व्यापार:** जेव्हा वस्तू किंवा सेवा दुसऱ्या देशातील खरेदीदारास विक्री केल्या जातात तेव्हा त्यास निर्यात व्यापार म्हणतात. उदा. भारत कच्चा कापूस चीनला निर्यात (विक्री) करतो.

iii. **पुनर्निर्यात:** हे आयात आणि निर्यातीचे एकत्रीकरण असते. यामध्ये एका देशातून आयात केलेला माल दुसऱ्या देशात पुनर्विक्रीसाठी पाठवला जातो. उदा. भारतील विक्रेते (व्यापार) जपानकडून माल घेतात आणि आफ्रिकेला पुनर्निर्यात करतात.

### १५. विदेशी व्यापाराचे दोन प्रकार सांगा. (T)

**उत्तर:** प्र. क्र. १ - १४ मधील मुद्दा क्र. २ अभ्यासा.

### १६. निर्यात व्यापार म्हणजे काय? (T)

**उत्तर:** प्र. क्र. १ - १४ मधील मुद्दा क्र. २ (ii) अभ्यासा.

Sample Content

### १७. अंतर्गत व्यापाराची व्याप्ती स्पष्ट करा. (T)

**उत्तर:** प्र. क्र. १ - १४ मधील मुद्दा क्र. १ अभ्यासा.

### १८. व्यापाराच्या अनुषंगिक साधनांची व्यापारामधील भूमिका थोडक्यात स्पष्ट करा. (T)

**उत्तर:** वाणिज्य हा व्यावसायिक कृतीचा असा घटक आहे, जो उद्योगांनी निर्माण केलेल्या वस्तू व सेवांचे वितरण करतो. वाणिज्याचे व्यापार व व्यापार अनुषंगिक सेवा असे दोन प्रकार पडतात.

**व्यापार अनुषंगिक सेवांचा अर्थ**

व्यापार अनुषंगिक साधने किंवा सेवा किंवा व्यावसायिक सेवा म्हणजे उत्पादनाच्या ठिकाणापासून विक्रीच्या ठिकाणापर्यंत वस्तूंचा सुरळीतपणे पुरवठा करण्यासाठी केलेली कृती होय. या सेवा वस्तू व सेवांचे उत्पादन आणि वितरण यांतील अडथळे कमी करतात. सोप्या शब्दांत, अनुषंगिक सेवा व्यापार सुरळीत चालण्यासाठी व्यापारास मदत करतात.

विविध अनुषंगिक सेवा पुढीलप्रमाणे आहेत:

१) **वाहतूक व्यवस्था**

वस्तूंचे उत्पादन एका ठिकाणी होते; मात्र या वस्तूंना विस्तृत भौगोलिक क्षेत्रात मागणी असते. उत्पादनाच्या ठिकाणी सर्व वस्तूंची विक्री करणे शक्य नसते. त्यामुळे, वस्तूला मागणी असलेल्या ठिकाणी ती पाठवणे आवश्यक असते. वस्तू व व्यक्तींना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाण्यासाठी वाहतुकीचा वापर केला जातो.

**टीप:** वाहतूक स्थान उपयोगिता निर्माण करते. स्थान उपयोगिता विशिष्ट स्थानावर वस्तू व सेवांच्या उपलब्धतेमुळे निर्माण झालेली उपयोगिता असते.

२) **गोदाम/साठवणूक**

उत्पादक व उपभोक्ता यांच्यामध्ये वेळेचे अंतर असते. कारण काही वस्तूंचे उत्पादन वर्षभर केले जाते; मात्र वापर विशिष्ट कालावधीतच केला जातो, तर काही उत्पादने विशिष्ट काळात उत्पादित केली जातात व वापर मात्र वर्षभर केला जातो.

उदा.

i. छत्र्यांचे उत्पादन वर्षभर घेतले जाते; परंतु जास्त मागणी पावसाळ्यात असते.

ii. आंब्यांचे उत्पादन केवळ एका हंगामात घेतले जाते; मात्र त्यांना वर्षभर मागणी असते.

त्यामुळे उत्पादन काळापासून विक्री काळापर्यंत उत्पादनाची साठवणूक काळजीपूर्वक करणे महत्त्वाचे असते. याशिवाय वस्तूंना विविध कारणाने होणारे धोके टाळण्यासाठी खास व्यवस्था करावी लागते. साठवणुकीमुळे वस्तू योग्य प्रकारे साठवणे शक्य होते आणि म्हणूनच ते काल उपयोगिता निर्माण करतात. या साठवणुकीच्या जागांना गोदाम असे म्हणतात. गोदामाच्या सुविधेमुळे उत्पादनाच्या किमती स्थिर ठेवण्यासाठी वस्तू व सेवांच्या मागणी व पुरवठ्यामध्ये नियमितता आणता येते. आजचा काळ मोठ्या प्रमाणावर उत्पादनाचा असल्यामुळे साठवणूक व्यवसायाची ही कार्ये पूर्ण करण्यास मदत करते.

**टीप:** काल उपयोगिता ही वस्तू किंवा सेवांच्या विशिष्ट कालावधीत उपलब्धतेमुळे निर्माण होते.

३) **विमा**

व्यवसायात अनेक प्रकारचे धोके असतात. उदा. वस्तू उत्पादन प्रक्रियेत/वाहतुकीच्या वेळी (अपघातामुळे), साठवणुकीत (आग किंवा चोरीमुळे) नष्ट होऊ शकतात. व्यावसायिकांना या धोक्यांपासून संरक्षण हवे असते म्हणजेच ते या धोक्यांपासून विम्याच्या मदतीने संरक्षण घेतात. यासाठी व्यावसायिक वस्तूचा विमा घेतल्यावर विमा कंपनीने ठरवलेले विमा हप्ते नियमितपणे भरतो. या बदल्यात विमा कंपन्या या सर्व धोक्यांपासून व्यवसायाचे संरक्षण करतात. जरी व्यावसायिक धोके पूर्णत: टाळता येत नसले तरी विमा घेऊन त्याची तीव्रता कमी करता येते.


४) **बँकिंग**

व्यवसाय स्थापन करण्यासाठी तसेच तो यशस्वीपणे चालवण्यासाठी पैशांची आवश्यकता असते. बँक व्यावसायिकांना वेळोवेळी पुरेशा निधीचा (पैशाचा) पुरवठा करते. बँका व्यावसायिकांना कर्जे, अधिविकर्ष सवलत, रोख उचल (Cash Credit) इत्यादी सेवा देतात. याशिवाय बँक धनादेश, डिमांड ड्राफ्ट, एटी.एम., डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड इत्यादी सेवा पुरवते. यामुळे व्यवसाय/व्यापाराचे दैनंदिन कामकाज सुरळीतपणे चालवण्यास मदत होते.

Sample content

५) **जाहिरात**

जाहिरात हे वस्तू व सेवांच्या विक्रीचे प्रभावी साधन आहे. जाहिरातीमार्फत उत्पादक आपल्या उत्पादनाविषयी सर्व माहिती ग्राहकाला देतो. यामुळे ग्राहकाच्या मनात वस्तू खरेदी करण्याची प्रबळ इच्छा जागृत होते. जाहिरातीचे वेगवेगळे मार्ग असतात. यात घरातील प्रसार माध्यमांच्या मदतीने ग्राहकांशी संवाद साधणारी जाहिरात (उदा. वर्तमानपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन) आणि घराबाहेरील प्रसार माध्यमांच्या मदतीने ग्राहकांशी संवाद साधणारी जाहिरात (उदा. पाट्या, फलक, कापडी फलक, बसच्या मागील जाहिरात, विद्युत प्रकाशित साधनांनी केली जाणारी जाहिरात इत्यादी) यांचा समावेश होतो. जाहिरात ग्राहकावर वस्तू खरेदी करण्यासाठी प्रभाव टाकते. त्यामुळे, व्यापाराला उत्तेजन मिळते.



**ज्ञानगुरू**

गेल्या अनेक वर्षांपासून कंपन्या ख्यातनाम व्यक्तींना त्यांच्या मालाची जाहिरात करण्यासाठी 'ब्रँड ॲम्बेसेडर' म्हणून नियुक्त करतात. ख्यातनाम व्यक्ती कंपनीच्या मालाचे समर्थन करण्यासाठी कंपनीकडून मोठी रक्कम घेतात, परंतु कंपनीला आपल्या 'ब्रँड' बद्दल जागरूकता वाढवण्याच्या दृष्टीने आणि जास्त विक्री करण्यासाठी याचा फायदा होतो.

६) **व्यापारी अभिकर्ते**

विक्रेत्याला आपल्या सर्व ग्राहकांना संपर्क करणे शक्य नसते कारण ते वेगवेगळ्या विस्तृत भागात विखुरलेले असतात. ही समस्या व्यापारी अभिकर्त्यांद्वारे सोडवली जाते. हे अभिकर्ते विक्रेते आणि ग्राहक यांच्यामधील दरी कमी करतात. दलाल, अडत्या, कमिशन एजंट इत्यादी व्यापारी अभिकर्त्यांची उदाहरणे आहेत.

७) **संदेशवहन**

आजच्या युगात माहितीचा विस्फोट झाला आहे. बाजारातील ग्राहक, व्यापारी, उत्पादक यांसारख्या विविध सदस्यांत माहितीचे संदेशवहन आवश्यक असते. ई-मेल, टपाल सेवा, फोन इत्यादी संदेशवहनाच्या विविध माध्यमांमुळे माहितीची देवाणघेवाण करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

**झटपट उजळणी** **(प्र. क्र. १ - १४ व १८)**

**वाणिज्य:** उद्योगाद्वारे उत्पादित वस्तू व सेवांच्या वितरणाशी संबंधित.

**वाणिज्याचे वर्गीकरण**

१) **व्यापार** (पैसा किंवा पैशाच्या मूल्याच्या बदल्यात वस्तू किंवा सेवांची देवाणघेवाण)

- **i. अंतर्गत व्यापार (देशांतर्गत)**
  - अ. घाऊक व्यापार: उत्पादकांकडून मोठ्या प्रमाणावर खरेदी करून किरकोळ व्यापाऱ्यांना विक्री.
  - ब. किरकोळ व्यापार: घाऊक व्यापाऱ्यांकडून खरेदी आणि लहान प्रमाणात अंतिम ग्राहकांना विक्री.
- **ii. विदेशी व्यापार/ आंतरराष्ट्रीय व्यापार (इतर देशांबरोबर)**
  - अ. आयात व्यापार: इतर देशांकडून वस्तू/सेवांची खरेदी.
  - ब. निर्यात व्यापार: इतर देशांना वस्तू/सेवांची विक्री.
  - क. पुनर्निर्यात: आयात केलेल्या वस्तू/सेवांची पुन्हा निर्यात.

२) **अनुषंगिक सेवा/ अनुषंगिक साधने** (व्यापारातील अडथळे दूर करणाऱ्या सर्व कृती)

उदा. वाहतूक, गोदाम, विमा, बँकिंग, व्यापारी अभिकर्ते, संदेशवहन इत्यादी.

**१९. कोणतीही चार अनुषंगिक साधने स्पष्ट करा.** **T**

**उत्तर:** प्र. क्र. १ - १८ अभ्यासा. (कोणतेही चार मुद्दे)

**२०. व्यापारासाठी बँक व विमा कशाप्रकारे उपयोगी असतात?** **T**

**उत्तर:** प्र. क्र. १ - १८ मधील मुद्दा क्र. ३ व ४ अभ्यासा.

Sample Content

**२१. व्यवसाय, पेशा व नोकरी यांचा तुलनात्मक अभ्यास करा. (T)**

**उत्तर:**

| व्यवसाय | पेशा | नोकरी |
|---|---|---|
| | **१) अर्थ** | |
| व्यवसाय म्हणजे नफा मिळवण्याच्या उद्देशाने वस्तू व सेवांचे उत्पादन करून बाजारात वितरण करण्याचा व्यावसायिकाचा पद्धतशीर प्रयत्न होय. | आर्थिक कृतीचा असा भाग ज्यामध्ये व्यक्ती तिच्या शैक्षणिक ज्ञानाचा आणि विशेष कौशल्याचा उपयोग पैसे कमवण्यासाठी सेवा देण्यासाठी करते. | आर्थिक कृती ज्यामध्ये व्यक्ती दुसऱ्यासाठी काम करते. |
| | **२) परतावा** | |
| व्यवसायात नफा मिळतो. | पेशामध्ये तज्ज्ञ सेवेसाठी फी आकारली जाते. | कर्मचाऱ्यांना पगार किंवा मजुरी मिळते. |
| | **३) भांडवल गुंतवणूक** | |
| व्यवसायाची व्याप्ती व विस्तारावर भांडवल गुंतवणूक अवलंबून असते. | स्वतंत्रपणे काम करणाऱ्या पेशा स्वीकारलेल्या व्यक्तीला मर्यादित भांडवल गुंतवावे लागते. | भांडवल गुंतवणूक करावी लागत नाही. मालक सर्व प्रकारचे स्रोत व सुविधा कर्मचाऱ्यांना पुरवतो. |
| | **४) कामाचे स्वरूप** | |
| जनतेला वस्तू व सेवा पुरवणे. | वैयक्तिक तज्ज्ञ सेवा पुरवणे. | कर्मचारी सेवा कराराप्रमाणे काम करतात. |
| | **५) पात्रता** | |
| विशिष्ट शैक्षणिक पात्रतेची आवश्यकता नसते. | संबंधित पेशाचे विशेष ज्ञान व प्रशिक्षण आवश्यक असते. | कामाच्या स्वरूपानुसार मालकाने निर्धारित केलेली शैक्षणिक पात्रता आवश्यक असते. |
| | **६) निर्णय प्रक्रिया** | |
| व्यावसायिक स्वत:चे निर्णय स्वत: घेऊ शकतात. | पेशा स्वीकारलेली व्यक्ती स्वत:च्या पेशा संदर्भात निर्णय घेऊ शकते. | कर्मचारी केवळ त्यांच्या कामासंदर्भात निर्णय घेऊ शकतात. त्यांना अंतिम निर्णय घेता येत नाही. |
| | **७) धोका** | |
| नफा हा अनिश्चित व अनियमित असतो. त्यामुळे, व्यवसायात मोठा धोका असतो. | फी ही निश्चित किंवा नियमित नसते. म्हणून, पेशामध्ये ठरावीक मर्यादेपर्यंत धोका असतो. | कर्मचाऱ्याला कराराप्रमाणे नियमित व निश्चित वेतन दिले जाते. म्हणून धोका नसतो. |
| | **८) उदाहरणे** | |
| बांधकाम व्यावसायिक, छपाई व्यावसायिक, पुस्तक विक्रेते इत्यादी. | डॉक्टर, सनदी लेखापाल, वकील इत्यादी. | कारकून, शिक्षक, अधिकारी इत्यादी. |

## प्र. २ फरक स्पष्ट करा. (T)

**१. उद्योग आणि वाणिज्य.**

**उत्तर:**

| उद्योग | वाणिज्य |
|---|---|
| **१) अर्थ** | |
| उद्योग अशी आर्थिक कृती आहे ज्यामध्ये संसाधनांचे वस्तू व सेवांमध्ये रूपांतर केले जाते. | उद्योगाने उत्पादित केलेल्या वस्तू व सेवांचे वितरण करणारा आर्थिक कृतीचा भाग. |
| **२) स्वरूप** | |
| हे वस्तू व सेवांच्या निर्मितीत गुंतलेले असतात. | हे वस्तू व सेवांच्या वितरणात गुंतलेले असतात. |

Sample Content

| | |
|---|---|
| **३) स्थळ** | |
| वस्तूचे उत्पादन कारखान्यात अथवा कार्यशाळेत केले जाते. | वितरण हे बाजारामध्ये आणि कार्यालयात केले जाते. |
| **४) उपयोगिता** | |
| यामुळे, रूप उपयोगिता निर्माण होते. | यामुळे स्थल, काल व स्वामित्व उपयोगिता निर्माण होते. |
| **५) स्रोत** | |
| यात मानवी श्रम व यंत्रांचा वापर केला जातो. | यात अधिक मानवी श्रम व संदेशवहन वापरले जाते. |
| **६) भांडवल** | |
| उद्योगासाठी प्रचंड भांडवलाची गरज असते. | तुलनेने वाणिज्यात कमी भांडवल गुंतवणूक करावी लागते. |
| **७) परस्परावलंबन** | |
| नफा मिळवण्यासाठी वितरण करण्याच्या उद्देशाने औद्योगिक उत्पादन केले जाते. | वस्तू व सेवांच्या उत्पादनाशिवाय वाणिज्यकृती सुरू करणे शक्य नसते. |
| **८) आयोजित** | |
| औद्योगिक कृती उत्पादकांद्वारा केल्या जातात. | व्यापारी व व्यापारी अभिकर्ते वस्तू व सेवा वितरण करतात. |
| **९) स्थान** | |
| उद्योगांना व्यवसायात प्रथम स्थान आहे. | वाणिज्य व्यवसायात द्वितीय स्थानावर आहे. |
| **१०) वर्गीकरण** | |
| ह्याचे प्राथमिक उद्योग, दुय्यम उद्योग व सेवा उद्योग असे वर्गीकरण करता येते. | याचे वर्गीकरण व्यापार व व्यापाराची अनुषंगिक साधने असे करता येते. |
| **११) बाजारपेठेतील शक्ती** | |
| हे बाजाराच्या पुरवठा बाजूचे प्रतिनिधित्व करतात. | हे बाजाराच्या मागणी व पुरवठा या बाजूंचे प्रतिनिधित्व करतात. |

**२. व्यवसाय व वाणिज्य.**

**उत्तर:**

| व्यवसाय | वाणिज्य |
|---|---|
| **१) अर्थ** | |
| व्यवसाय म्हणजे नफा मिळवण्याच्या उद्देशाने वस्तू व सेवांचे उत्पादन करून बाजारात विक्री करण्याचा व्यावसायिकाचा पद्धतशीर प्रयत्न होय. | वाणिज्य हा आर्थिक कृतीचा असा भाग आहे, जो उद्योगाने उत्पादित केलेल्या वस्तू व सेवांचे वितरण करतो. |
| **२) संकल्पना** | |
| व्यवसाय ही व्यापक संकल्पना असून त्यात वाणिज्यचा समावेश होतो. | हा व्यवसायाचा भाग असून ही संकुचित संकल्पना आहे. |
| **३) कौशल्य** | |
| व्यवसायात तांत्रिक व विपणन कौशल्याची गरज असते. | वाणिज्यात केवळ विपणन कौशल्याची गरज असते. |
| **४) वर्गीकरण** | |
| व्यवसायाचे विभाजन उद्योग व वाणिज्यामध्ये होते. | वाणिज्याचे विभाजन व्यापार व व्यापार अनुषंगिक साधने यामध्ये होते. |

**३. व्यवसाय व पेशा.**

**उत्तर:** प्र. क्र. १ – २१ अभ्यासा.

**४. नोकरी आणि पेशा.**

**उत्तर:** प्र. क्र. १ – २१ अभ्यासा.

Sample Content

# १ वाणिज्य व व्यवसायाची ओळख

## वस्तुनिष्ठ प्रश्न

**(अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१. _______ कृतींचे वर्गीकरण आर्थिक कृती व आर्थिकेतर कृतींमध्ये करता येते.
अ. मानवी ब. व्यावसायिक क. औद्योगिक
मानवी

२. व्यवसायातील परताव्याला _______ म्हणतात. **(T)**
अ. फी ब. पगार क. नफा
नफा

३. व्यवसायातील उत्पादन विक्रीसाठी _______ अवलंबून असतात. **(T)**
अ. उद्योगावर ब. समाजावर क. कर्मचाऱ्यांवर
समाजावर

४. स्वतंत्रपणे पेशाचा सराव करणाऱ्या व्यक्तीला_______ भांडवलाची गरज असते.
अ. मर्यादित ब. मोठ्या क. नियमित
मोठ्या

५. राष्ट्रीय स्तरावरील आचारसंहिता _______ साठी बनवलेली असते. **(T)**
अ. पेशा स्वीकारणाऱ्या व्यक्ती ब. व्यावसायिक क. कर्मचारी
पेशा स्वीकारणाऱ्या व्यक्ती

६. वकील हा _______ असतो. **(T)**
अ. पेशा स्वीकारणारा ब. व्यावसायिक क. कर्मचारी
पेशा स्वीकारणारा

७. _______ एकाकडून दुसऱ्याकडे हस्तांतरित करता येत नाही.
अ. नोकरी ब. व्यवसाय क. व्यापार
नोकरी

८. कच्च्या मालाचे तयार मालात रूपांतर करण्याचे काम _______ करतो. **(T)**
अ. जैविक उद्योग ब. उत्खनन उद्योग क. उत्पादक उद्योग
उत्पादक उद्योग

९. धरण बांधण्यासाठीचे काम _______ उद्योगाअंतर्गत केले जाते. **(T)**
अ. प्राथमिक ब. दुय्यम क. सेवा
दुय्यम

१०. वाणिज्य ही _______ शाखा आहे. **(T)**
अ. व्यवसायाची ब. उद्योगाची क. व्यापाराची
व्यवसायाची

११. वस्तूंची प्रत्यक्ष खरेदी-विक्री म्हणजेच _______ होय. **(T)**
अ. पेशा ब. व्यापार क. उद्योग
व्यापार

१२ _______ हा अंतर्गत व्यापाराचा प्रकार नाही.
अ. घाऊक व्यापार ब. पुनर्निर्यात व्यापार क. किरकोळ व्यापार
पुनर्निर्यात व्यापार

१३. अंतराची समस्या _______ मुळे सोडवली जाते. **(T)**
अ. बँक ब. वाहतूक क. गोदाम
वाहतूक

१४. गोदामामुळे वस्तूमध्ये _______ उपयोगिता निर्माण होते. **(T)**
अ. ठिकाण ब. समय क. रूप
समय

१५. _______ ला तांत्रिक तसेच विपणन कौशल्याची गरज असते.
अ. व्यवसाय ब. वाणिज्य क. आर्थिकेतर कृती
व्यवसाय

Sample Content

**(ब) योग्य जोड्या जुळवा. (T)**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| १. | दिव्यांग व्यक्तींना मदत | अ. | सामाजिक उद्दिष्टे |
| २. | जैविक उद्योग | ब. | विदेशी व्यापार |
| ३. | स्थानिक चलन | क. | रेशीम उद्योग |
| ४. | सामाजिक प्रश्नांची सोडवणूक | ड. | आर्थिकेतर उपक्रम |
| | | इ. | देशी व्यापार |
| | | फ. | खाणकाम |
| | | ग. | नफा |
| | | ह. | आर्थिक कृती |

१ - ड
२ - क
३ - इ
४ - अ

**(क) खालील विधानांसाठी एक शब्द किंवा शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा.**

| | | |
|---|---|---|
| १. | जी कृती मानवाकडून पैसा मिळवण्यासाठी केली जाते. **(T)** | आर्थिक कृती |
| २. | नफा मिळवण्याच्या उद्देशाने वस्तू व सेवांचे उत्पादन व वितरण संबंधित नियमितपणे केली जाणारी कृती. **(T)** | व्यवसाय |
| ३. | वस्तू आणि सेवांच्या बदल्यात वस्तू आणि सेवांची देवाणघेवाण. | वस्तू विनिमय |
| ४. | व्यवसायाची अशी कृती ज्यामध्ये एखादी व्यक्ती फी घेऊन उत्तम तज्ज्ञ सेवा देण्याचे मान्य करतो. **(T)** | पेशा |
| ५. | काम पूर्ण झाल्यानंतर कर्मचाऱ्याला आर्थिक स्वरूपात दिला जाणारा मोबदला. | मजुरी/वेतन |
| ६. | वस्तू व सेवेच्या उत्पादनाशी संबंधित असणाऱ्या व्यावसायिक कृतीचे नाव. **(T)** | उद्योग |
| ७. | समान किंवा संबंधित वस्तू उत्पादित करणाऱ्या संस्थांचा समूह. | उद्योग |
| ८. | निसर्गावर अवलंबून असणाऱ्या किंवा निसर्गाभिमुख उद्योगांचा गट. | प्राथमिक उद्योग |
| ९. | प्राणी व वनस्पती यांच्या पुनरुत्पादनाशी संबंधित असलेला व्यवसाय. | जैविक उद्योग |
| १०. | स्थिर प्रकारची संपत्ती निर्माण करणारे उद्योग. **(T)** | बांधकाम उद्योग |
| ११. | प्राथमिक व दुय्यम उद्योगाला साहाय्य करणारे उद्योग. | सेवा उद्योग |
| १२. | वस्तू व सेवेच्या वितरणाशी संबंधित असलेल्या व्यवसाय कृतीचे नाव. **(T)** | वाणिज्य |
| १३. | पैसा आणि पैशाचे मूल्य असलेल्या मोबदल्यात केलेली वस्तूंची खरेदी-विक्री. **(T)** | व्यापार |
| १४. | दोन देशांमधील व्यापार. | विदेशी व्यापार/आंतरराष्ट्रीय व्यापार |
| १५. | अशी कृती जी व्यापारातील अडचणी दूर करते. **(T)** | व्यापाराची अनुषंगिक साधने/व्यापाराच्या अनुषंगिक सेवा/व्यावसायिक सेवा |
| १६. | व्यक्ती व साधनसंपत्तीच्या एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी होणाऱ्या हालचालीसंबंधीची कृती. **(T)** | वाहतूक |
| १७. | समय उपयोगिता निर्माण करणारे व्यापारी अनुषंगिक साधन. **(T)** | गोदाम / साठवणूक |
| १८. | विक्रेता व खरेदीदार यांच्यातील दरी कमी करणारे अनुषंगिक साधन. | व्यापारी अभिकर्ते |

**(ड) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.**

| | | |
|---|---|---|
| १. | व्यवसाय ही एक आर्थिक कृती आहे. **(T)** | बरोबर |
| २. | कोणत्याही व्यवसायात कमीत कमी चार पक्ष असतात. | चूक |
| ३. | प्रत्येक पेशा हा पैसा मिळवण्यासाठी केला जातो. **(T)** | बरोबर |

Sample Content

| | | |
|---|---|---|
| ४. | नोकरीचे मुख्य उद्‌दिष्ट हे केवळ मालकाच्या गरजा भागवण्यासाठी पैसे कमावणे हे असते. | चूक |
| ५. | नवे ग्राहक शोधणे हे व्यावसायिक कृतीचे एक आर्थिक उद्‌दिष्ट आहे. | बरोबर |
| ६. | नफ्याची पुनर्गुंतवणूक व्यवसायाच्या वृद्‌धी आणि विस्तारासाठी मदत करते. | बरोबर |
| ७. | नफ्यामुळे व्यवसायांची एकूणच कार्यक्षमता वाढते. **(T)** | बरोबर |
| ८. | उद्योगामुळे रूप उपयोगिता निर्माण होते. **(T)** | बरोबर |
| ९. | प्राथमिक व्यवसाय हे निसर्गाशी संबंधित असतात. **(T)** | बरोबर |
| १०. | रोपवाटिका उत्खनन उद्योगात येतात. **(T)** | चूक |
| ११. | उद्योग हे व्यापार आणि व्यापाराची अनुषंगिक साधने यांमध्ये विभागलेले असतात. | चूक |
| १२. | व्यापारामध्ये वाणिज्याचा समावेश होतो. **(T)** | चूक |
| १३. | व्यापारामध्ये वस्तू व सेवांच्या खरेदी व विक्रींचा समावेश होतो. **(T)** | बरोबर |
| १४. | किरकोळ व्यापारी हा उत्पादक व घाऊक व्यापारी यांच्यातील दुवा आहे. **(T)** | चूक |
| १५. | आयात व्यापार हा निर्यात आणि पुनर्निर्यात व्यापाराचे एकत्रीकरण आहे. | चूक |
| १६. | गोदामामुळे वेळेची समस्या दूर होते. **(T)** | बरोबर |

**(इ) गटात न बसणारा शब्द ओळखा.**

**टीप:** ह्याची कारणे केवळ आकलन सुलभ होण्यासाठी दिली आहेत.

**१. आईने स्वयंपाक बनवणे, कारखान्यात काम करणे, लोकांची सेवा करणे, पुस्तक वाचणे.**

**उत्तर:** कारखान्यात काम करणे.

**कारण:** कारखान्यात काम करणे ही आर्थिक कृती आहे, तर इतर सर्व आर्थिकेतर कृतींची उदाहरणे आहेत.

**२. व्यवहार सातत्य, संघटनेत नोंदणी, वस्तू व सेवांचा विनिमय, नफा हेतू.**

**उत्तर:** संघटनेत नोंदणी.

**कारण:** संघटनेत नोंदणी हे पेशाचे वैशिष्ट्य आहे, तर इतर सर्व व्यवसायाची वैशिष्ट्ये आहेत,

**३. नावीन्यपूर्ण उपक्रम, दर्जेदार उत्पादनांचा पुरवठा, कर्मचारी कल्याण, व्यापारातील गैरव्यवहार टाळणे.**

**उत्तर:** नावीन्यपूर्ण उपक्रम.

**कारण:** नावीन्यपूर्ण उपक्रम आर्थिक उद्‌दिष्ट आहे, तर इतर सर्व व्यवसायाची सामाजिक उद्‌दिष्टे आहेत.

**४. कृषी उद्योग, उत्पादन उद्योग, जैविक उद्योग, उत्खनन उद्योग. (T)**

**उत्तर:** उत्पादन उद्योग.

**कारण:** उत्पादन उद्योग दुय्यम उद्योग आहे, तर इतर सर्व प्राथमिक उद्योग आहेत.

**५. हॉटेल उद्योग, मनोरंजन उद्योग, बांधकाम उद्योग, पर्यटन उद्योग.**

**उत्तर:** बांधकाम उद्योग.

**कारण:** बांधकाम उद्योग दुय्यम उद्योगाचा प्रकार आहे, तर इतर सर्व सेवा उद्योगाचे प्रकार आहेत.

**६. चहा, दूध, कॉफी, यंत्रसामग्री. (T)**

**उत्तर:** यंत्रसामग्री.

**कारण:**यंत्रसामग्री दुय्यम उद्योगाशी संबंधित आहे, तर इतर सर्व प्राथमिक उद्योगाशी संबंधित आहेत.

**७. आयात व्यापार, निर्यात व्यापार, घाऊक व्यापार, पुनर्निर्यात व्यापार. (T)**

**उत्तर:** घाऊक व्यापार.

**कारण:** घाऊक व्यापार अंतर्गत व्यापाराशी संबंधित आहे, तर इतर सर्व विदेशी व्यापाराशी संबंधित आहेत.

Sample Content

**८. बँक, विमा, वाहतूक, उत्पादन. (T)**

**उत्तर:** उत्पादन.

**कारण:** उत्पादन हे दुय्यम उद्योगाशी संबंधित आहे, तर इतर सर्व सेवा उद्योगाशी संबंधित आहेत.

**(फ) खालील विधाने पूर्ण करा.**

| | | |
|---|---|---|
| १. | आर्थिक कृती अशी कृती, की जी _______ मिळवण्यासाठी केली जाते. **(T)** | पैसा/उपजीविका |
| २. | व्यवसाय ही _______ कृती आहे. **(T)** | आर्थिक |
| ३. | वस्तू व सेवांचे वितरण म्हणजे _______ होय. **(T)** | वाणिज्य/विपणन |
| ४. | नफा मिळवणे हा _______ चा मुख्य हेतू असतो. **(T)** | व्यवसाय |
| ५. | व्यवसायातील अनेक धोके स्वीकारल्याबद्दल मिळणाऱ्या मोबदल्यास _______ म्हणतात. **(T)** | नफा |
| ६. | _______ समाधान हे सर्व आर्थिक उपक्रमांचे अंतिम ध्येय असते. | ग्राहकांचे |
| ७. | तज्ज्ञ सेवेच्या मोबदल्यात व्यावसायिक _______ आकारतात. **(T)** | फी / शुल्क |
| ८. | _______ ही व्यक्ती कर्मचाऱ्यांना काम देते. **(T)** | मालक |
| ९. | खर्चापेक्षा महसुली उत्पन्न अधिक असणे म्हणजे _______ होय. | नफा |
| १०. | उद्योगामुळे _______ निर्माण होते. **(T)** | रूप उपयोगिता |
| ११. | _______ उद्योग प्राथमिक उद्योगांवर अवलंबून असतात. | दुय्यम |
| १२. | _______ मध्ये वस्तूंचे वितरण सुलभपणे व अविरतपणे पुरवणाऱ्या कृतींचा समावेश असतो. | वाणिज्य |
| १३. | _______ व्यापारामध्ये वस्तूंची खरेदी व विक्री मोठ्या प्रमाणावर चालते. **(T)** | घाऊक |
| १४. | _______ हा घाऊक व्यापारी व ग्राहकामधील दुवा आहे. **(T)** | किरकोळ व्यापारी |
| १५. | अंतर्गत व्यापाराला _______ असेही म्हणतात. | देशी व्यापार |

**(ग) कंसातील अचूक पर्याय निवडा. (T)**

| अनु. क्र. | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| १. | विभिन्न देशांमध्ये चालणारा व्यापार | _______________ |
| २. | दुसऱ्या देशाकडून वस्तू व सेवांची खरेदी | _______________ |
| ३. | _______________ | वस्तू व सेवांची विदेशी ग्राहकाला केलेली विक्री |
| ४. | _______________ | उत्पादक व किरकोळ व्यापारी यांच्यामधील दुवा |

(निर्यात व्यापार, विदेशी व्यापार, घाऊक व्यापार, आयात व्यापार)

**उत्तर:**

| अनु. क्र. | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| १. | विभिन्न देशांमध्ये चालणारा व्यापार | **विदेशी व्यापार** |
| २. | दुसऱ्या देशाकडून वस्तू व सेवांची खरेदी | **आयात व्यापार** |
| ३. | **निर्यात व्यापार** | वस्तू व सेवांची विदेशी ग्राहकाला केलेली विक्री |
| ४. | **घाऊक व्यापार** | उत्पादक व किरकोळ व्यापारी यांच्यामधील दुवा |

**(ह) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

**१. आर्थिक कृती म्हणजे काय? (T)**

**उत्तर:** समाजातील सर्व स्तरातून वस्तू व सेवा यांचे उत्पादन, वितरण आणि उपभोग इत्यादींशी संबंधित असलेल्या कृती म्हणजे आर्थिक कृती होत.

**२. आर्थिकेतर कृती म्हणजे काय? (T)**

**उत्तर:** पैशांची अपेक्षा न ठेवता वैयक्तिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व भावनिक समाधान करणाऱ्या कृती म्हणजे आर्थिकेतर कृती होत.

Sample Content

**३. उपभोग्य व भांडवली वस्तू म्हणजे काय?**

**उत्तर:** ज्या वस्तूंचा उपभोग थेटपणे अंतिम ग्राहकांद्वारा घेतला जातो, त्यांना उपभोग्य वस्तू असे म्हणतात, तर ज्या वस्तूंचा वापर इतर उद्योगांद्वारा पुढील उत्पादनासाठी केला जातो, त्यांना भांडवली वस्तू म्हणतात.

**४. प्राथमिक उद्योग म्हणजे काय? (T)**

**उत्तर:** प्राथमिक उद्योग हा उद्योगाचा एक प्रकार आहे जो निसर्गाशी संबंधित असतो. हा निसर्गाभिमुख उद्योग असतो. उदा. शेती, तेल आणि खनिजांचे उत्खनन, पशुपालन.

**५. जैविक उद्योगांचा अर्थ काय?(T)**

**उत्तर:** जैविक उद्योग हा प्राथमिक उद्योगाचा प्रकार आहे जो प्राणी आणि वनस्पती यांच्या पुनरुत्पादनाशी संबंधित असतो.

**६. दुय्यम उद्योग म्हणजे काय?(T)**

**उत्तर:** दुय्यम उद्योग हा उद्योगाचा असा प्रकार आहे ज्यात प्राथमिक उद्योगाने पुरवलेल्या कच्च्या मालावर प्रक्रिया करून त्याचे पक्क्या मालात रूपांतर केले जाते. उदा. प्राथमिक उद्योगाद्वारे पुरवलेल्या टोमॅटोपासून सॉस (रस) किंवा केचअप बनवला जातो.

**७. वाणिज्य म्हणजे काय? (T)**

**उत्तर:** वाणिज्य हा व्यावसायिक कृतीचा असा घटक आहे, जो उद्योगाद्वारे उत्पादित वस्तू व सेवांचे वितरण करतो.

**८. व्यापार म्हणजे काय?(T)**

**उत्तर:** पैसा किंवा पैशाचे मूल्य यांच्या बदल्यात वस्तू किंवा सेवांची देवाणघेवाण म्हणजे व्यापार होय.

**९. घाऊक व्यापारी म्हणजे काय? (T)**

**उत्तर:** उत्पादकांकडून मोठ्या प्रमाणात माल खरेदी करून तो लहान प्रमाणात किरकोळ व्यापाऱ्याला विकणाऱ्या व्यापाऱ्याला घाऊक व्यापारी म्हणतात.

**१०. किरकोळ व्यापाऱ्याचा अर्थ सांगा. (T)**

**उत्तर:** घाऊक व्यापाऱ्यांकडून (काही वेळेस थेट उत्पादकांकडून) माल खरेदी करून लहान प्रमाणात अंतिम ग्राहकाला त्याची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याला किरकोळ व्यापारी म्हणतात.

**११. आयात व्यापाराचा अर्थ काय? (T)**

**उत्तर:** जेव्हा वस्तू किंवा सेवा दुसऱ्या देशाकडून खरदी केल्या जातात तेव्हा त्याला आयात व्यापार म्हणतात. उदा. भारत सौदी अरेबिया कडून कच्चे तेल आयात (खरेदी) करतो.

**१२. निर्यात व्यापाराचा अर्थ काय? (T)**

**उत्तर:** जेव्हा वस्तू किंवा सेवा विदेशातील खरेदीदाराला विकल्या जातात तेव्हा त्याला निर्यात व्यापार म्हणतात. उदा. भारत कच्चा कापूस चीनला निर्यात (विक्री) करतो.

**१३. पुनर्निर्यात व्यापार म्हणजे काय? (T)**

**उत्तर:** पुनर्निर्यात व्यापार म्हणजे एका देशातून वस्तू आयात करणे व त्याची पुनर्विक्री दुसऱ्या देशाला करणे होय. उदा. भारत जपानकडून माल खरेदी करून त्याची पुनर्निर्यात आफ्रिकेला करतो.

**१४. व्यापाराची अनुषंगिक साधने म्हणजे काय? (T)**

**उत्तर:** उत्पादनाच्या ठिकाणाहून विक्रीच्या ठिकाणापर्यंत वस्तूंचा सुरळीतपणे पुरवठा करण्यासाठी केलेल्या सर्व कृती म्हणजेच व्यापाराची अनुषंगिक साधने किंवा व्यावसायिक सेवा होय.

**१५. व्यापारी अभिकर्ते व्यापार कृतींना कशाप्रकारे मदत करतात?**

**उत्तर:** व्यापारी अभिकर्ते ग्राहक व विक्रेते यांच्यामधील दरी कमी करून व्यापार कृतींना मदत करतात.

**(ई) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

**१. व्यवसाय ही आर्थिकेतर कृती आहे. (T)**

**उत्तर:** व्यवसाय ही आर्थिक कृती आहे.

Sample Content

**२. व्यवसायाचा मुख्य उद्देश सेवाप्रदान करणे होय. (T)**

**उत्तर:** व्यवसायाचा मुख्य उद्देश नफा मिळवणे होय.

**३. नोकरीसाठी भांडवलाची गरज असते. (T)**

**उत्तर:** व्यवसायासाठी भांडवलाची गरज असते.

**४. वस्तू विनिमयासाठी पैशाचा उपयोग केला जातो. (T)**

**उत्तर:** वस्तू विनिमयासाठी वस्तू/सेवांचा उपयोग केला जातो.

**५. आवश्यक पात्रता धारण केल्यानंतरच व्यवसाय केला जाऊ शकतो.**

**उत्तर:** आवश्यक पात्रता धारण केल्यानंतरच पेशा केला जाऊ शकतो.

**६. पेशा हा दुसऱ्या व्यक्तीला हस्तांतर करता येतो. (T)**

**उत्तर:** पेशा हा दुसऱ्या व्यक्तीला हस्तांतर करता येत नाही.

**७. व्यवसायाला बाजारात स्थिर राहण्यासाठी व्यापार मदत करतो.**

**उत्तर:** व्यवसायाला बाजारात स्थिर राहण्यासाठी नफा मदत करतो.

**८. उद्योगामुळे स्थल उपयोगिता निर्माण होते. (T)**

**उत्तर:** वाहतुकीमुळे स्थल उपयोगिता निर्माण होते.

**९. बाजारातील पुरवठ्याची बाजू वाणिज्य सांभाळते. (T)**

**उत्तर:** बाजारातील पुरवठ्याची बाजू उद्योग सांभाळतो.

**१०. उद्योग वस्तू आणि सेवांची मालकी विक्रेत्याकडून ग्राहकाकडे हस्तांतरित करतात.**

**उत्तर:** व्यापार वस्तू आणि सेवांची मालकी विक्रेत्याकडून ग्राहकाकडे हस्तांतरित करतात.

**११. बँकेमुळे व्यवसायातील धोक्याची तीव्रता कमी करता येते.**

**उत्तर:** विम्यामुळे व्यवसायातील धोक्याची तीव्रता कमी करता येते.

**१२. उद्योग स्थल व काल उपयोगिता निर्माण करतात.**

**उत्तर:** वाणिज्य स्थल व काल उपयोगिता निर्माण करते.

## खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा.

**१. आर्थिक कृती. (T)**

**उत्तर:** समाजातील सर्व स्तरांतून वस्तू व सेवा यांचे उत्पादन, वितरण आणि उपभोग इत्यादी बाबींशी संबंधित असलेल्या कृतींचा समावेश आर्थिक कृतींमध्ये होतो. आर्थिक कृती उपजीविकेसाठी केल्या जातात. व्यवसाय, पेशा व नोकरी ही आर्थिक कृतीची विविध रूपे आहेत.

**२. आर्थिकेतर कृती (T)**

**उत्तर:** मानवाच्या पैशांची अपेक्षा न ठेवलेल्या वैयक्तिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व भावनिक समाधान करणाऱ्या कृतींना आर्थिकेतर कृती म्हणतात. उदा. पुस्तके वाचणे, समाजसेवा, आईने स्वयंपाक करणे इत्यादी.

**३. व्यवसाय (T)**

**उत्तर:** व्यवसाय ही मानवाकडून केली जाणारी एक आर्थिक कृती आहे. ही व्यक्ती किंवा व्यक्तींच्या समूहाचे पद्धतशीर प्रयत्न दर्शवते. यात वस्तू व सेवांचे उत्पादन करून आणि बाजारपेठेमध्ये त्यांची विक्री करून नफ्याच्या स्वरूपात मोबदला मिळवण्याचा पद्धतशीर प्रयत्न व्यावसायिकाकडून केला जातो.

**४. पेशा (T)**

**उत्तर:** पेशा म्हणजे आर्थिक कृतीचा असा भाग आहे, ज्यामध्ये व्यक्ती तिच्या शैक्षणिक ज्ञानाचा आणि विशेष कौशल्याचा उपयोग करून पैसे (फी) मिळवण्यासाठी सेवा देते. उदा. डॉक्टर, वकील, हिशोब तपासनीस आपल्या ज्ञानाचा व कौशल्याचा उपयोग करून त्यांच्या ग्राहकांना सेवा देतात व त्याबद्दल फी (पैसे) घेतात.

Sample Content

**५. नोकरी (T)**

**उत्तर:** नोकरी म्हणजे अशी आर्थिक कृती आहे, ज्यामध्ये व्यक्ती दुसऱ्यासाठी काम करतात. या आर्थिक कृतीमध्ये मालक-कामगार नातेसंबंध असतो. मालक म्हणजे अशी व्यक्ती जी दुसऱ्याला कामाची संधी देऊ करते तर कर्मचारी म्हणजे अशी व्यक्ती जी कामाची संधी स्वीकारते. कामाचा मोबदला व अटी यांबाबत मालक व कामगार यांमध्ये करार झालेला असतो.

**६. देशी व्यापार (T)**

**उत्तर:** जेव्हा व्यापार (वस्तू व सेवांची खरेदी-विक्री) देशाच्या भौगोलिक सीमांतर्गत केला जातो तेव्हा त्याला देशी व्यापार किंवा अंतर्गत व्यापार म्हणतात. या व्यापारासाठी देशी चलन वापरले जाते. देशी व्यापाराची घाऊक व्यापार व किरकोळ व्यापार या दोन प्रकारांत विभागणी केली जाते.

**७. विदेशी व्यापार (T)**

**उत्तर:** दोन किंवा अधिक देशांमध्ये चालणाऱ्या व्यापारास विदेशी व्यापार किंवा आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणतात. जेव्हा दोन देशांच्या सीमा ओलांडल्या जातात तेव्हा वेगवेगळे चलन वापरले जाते. विदेशी व्यापाराचे आयात व्यापार, निर्यात व्यापार, पुनर्निर्यात व्यापार असे तीन प्रकार आहेत.

**८. जाहिरातीचे मार्ग**

**उत्तर:** जाहिरात ही उत्पादित वस्तू आणि सेवांच्या विक्रीचे प्रभावी साधन आहे. त्यासाठी विविध मार्ग वापरले जातात. यामध्ये घरातील प्रसारमाध्यमांच्या मदतीने केली जाणारी जाहिरात (वृत्तपत्र, आकाशवाणी, दूरदर्शन इत्यादी) त्याचप्रमाणे घराबाहेरील प्रसारमाध्यमांच्या मदतीने केली जाणारी जाहिरात (पाट्या, फलक, कापडी फलक, विद्युत प्रकाशित साधनानी केली जाणारी जाहिरात इत्यादी) यांचा समावेश होतो.

## खालील विधाने सकारण स्पष्ट करा.

**१. व्यवसाय हा आर्थिक कृतीचा भाग आहे. (T)**

**उत्तर:**
i. मानवाच्या सर्व कृतींचे आर्थिक आणि आर्थिकेतर कृती असे वर्गीकरण करता येते.
ii. समाजातील सर्व स्तरांतून वस्तू व सेवा यांचे उत्पादन, वितरण आणि उपभोग इत्यादी बाबींशी संबंधित असलेल्या कृतींचा समावेश आर्थिक कृतींमध्ये होतो.
iii. आर्थिक कृती उपजीविकेसाठी केली जाते.
iv. वस्तू व सेवांचे उत्पादन करून आणि बाजारपेठेमध्ये त्यांची विक्री करून नफ्याच्या स्वरूपात मोबदला मिळवण्याचा पद्धतशीर प्रयत्न म्हणजे व्यवसाय होय.
v. म्हणूनच, व्यवसाय हा आर्थिक कृतीचा भाग आहे.

**२. व्यावसायिक कृतीत जोखीम अपरिहार्य आहे. (T)**

**उत्तर:**
i. जोखीम हा प्रत्येक व्यवसायातील महत्त्वाचा घटक आहे.
ii. प्रत्येक व्यवसायात कमी अधिक प्रमाणात प्रतिकूल किंवा अनिष्ट परिस्थितीमुळे जोखीम असतेच.
iii. काही घटक हे व्यावसायिकाच्या नियंत्रणापलीकडे असतात. उदा. ग्राहकांच्या रुचीतील बदल, ग्राहकांच्या आवडीनिवडी फॅशन, उत्पादन पद्धतीतील बदल, नैसर्गिक बदल, आग, चोरी, सरकारी धोरण इत्यादी.
iv. कोणताही व्यवसाय या जोखीम/धोक्यापासून मुक्त नाही.
v. धोक्याची तीव्रता कमी करता येऊ शकते; मात्र तो पूर्णपणे टाळता येत नाही.
vi. म्हणूनच, व्यावसायिक कृतीत जोखीम अपरिहार्य आहे.

**३. बाजारातील सतत बदलणाऱ्या फॅशनमुळे व्यवसायाला धोका निर्माण होतो.**

**उत्तर:**
i. वस्तू व सेवांचे उत्पादन करून आणि बाजारपेठेमध्ये त्यांची विक्री करून नफ्याच्या स्वरूपात मोबदला मिळवण्याचा पद्धतशीर प्रयत्न म्हणजे व्यवसाय होय.
ii. प्रत्येक व्यवसायात चालू फॅशनप्रमाणे मालाचे उत्पादन घेतले जाते.
iii. उत्पादन हे मोठ्या प्रमाणात घेऊन बाजारातील मागणीप्रमाणे पुरवठा करण्यासाठी त्याची गोदामात साठवणूक करण्यात येते.

Sample Content

iv. जर फॅशनमध्ये बदल झाला, तर साठवणूक केलेल्या मालाची विक्री होत नाही.
v. जर व्यवसायात जुन्या फॅशनचा मोठा साठा असेल, तर त्या व्यवसायाला मोठे नुकसान सहन करावे लागू शकते.
vi. म्हणूनच, हे व्यवसायातील धोक्याचे एक महत्त्वाचे कारण आहे.

**४. वाणिज्याची कृती सुरू होण्यापूर्वी उद्योग कार्याला सुरुवात होते. (T)**

**उत्तर:** i. व्यावसायिक कृतींचे दोन मुख्य गटांत वर्गीकरण करता येते, ते म्हणजे उद्योग आणि वाणिज्य.
ii. उद्योग हा वस्तूंचे उत्पादन व सेवांचा पुरवठा यांच्याशी संबंधित असतो.
iii. वाणिज्य हा उद्योगाने उत्पादित केलेल्या वस्तू व सेवांच्या वितरणाशी संबंधित असलेला व्यावसायिक कृतीचा भाग आहे.
iv. वस्तू आणि सेवांचे वितरण (वाणिज्य) त्यांचे उत्पादन (उद्योग) झाल्यानंतरच करता येऊ शकते.
v. म्हणूनच, वाणिज्याची कृती सुरू होण्यापूर्वी उद्योग कार्याला सुरुवात होते.

**५. वाणिज्य ही संज्ञा व्यापारापेक्षा व्यापक आहे. (T)**

**उत्तर:** i. व्यावसायिक कृतींचे वर्गीकरण दोन मुख्य गटांत करता येऊ शकते, ते म्हणजे उद्योग आणि वाणिज्य होय.
ii. उद्योगाने उत्पादित केलेल्या वस्तू व सेवांच्या वितरणाशी संबंधित असलेला व्यावसायिक कृतीचा भाग म्हणजे वाणिज्य होय.
iii. वाणिज्याचे व्यापार व व्यापाराची अनुषंगिक साधने असे दोन प्रकार पडतात.
iv. पैसा किंवा पैशाचे मूल्य यांच्या बदल्यात वस्तू व सेवा यांची देवाणघेवाण म्हणजे व्यापार होय. तो वस्तू आणि सेवांची खरेदी विक्री दर्शवतो.
v. व्यापार हा वाणिज्याचा भाग आहे.
vi. म्हणूनच, वाणिज्य ही संज्ञा व्यापारापेक्षा व्यापक आहे.

**६. घाऊक व्यापारी उत्पादक व किरकोळ व्यापाऱ्यातील दुवा होय. (T)**

**उत्तर:** i. घाऊक व्यापार हा अंतर्गत किंवा देशी व्यापाराचा एक प्रकार आहे.
ii. घाऊक व्यापारामध्ये माल मोठ्या प्रमाणावर खरेदी करून त्याची विक्री केली जाते.
iii. घाऊक व्यापारी मोठ्या प्रमाणात उत्पादकांकडून माल खरेदी करतात आणि लहान प्रमाणात किरकोळ व्यापाऱ्यांना विकतात.
iv. म्हणूनच, घाऊक व्यापारी उत्पादक व किरकोळ व्यापाऱ्यातील दुवा असतो.

**७. किरकोळ व्यापारी अंतिम ग्राहकांशी थेट संपर्क प्रस्थापित करतो. (T)**

**उत्तर:** i. किरकोळ व्यापार हा अंतर्गत किंवा देशी व्यापाराचा एक प्रकार आहे.
ii. किरकोळ व्यापारी घाऊक व्यापाऱ्याकडून (काही वेळेस थेट उत्पादकाकडून) माल खरेदी करतो आणि लहान प्रमाणात अंतिम ग्राहकांना विक्री करतो.
iii. किरकोळ व्यापारी हा घाऊक व्यापारी व अंतिम ग्राहक यांमधील दुवा असतो.
iv. ग्राहक किरकोळ व्यापाऱ्याच्या दुकानाला भेट देऊन त्यांच्याकडून माल खरेदी करतात.
v. म्हणूनच, असे म्हणता येईल, की किरकोळ व्यापारी अंतिम ग्राहकांशी थेट संपर्क प्रस्थापित करतो.

**८. आयात-निर्यात व्यापारांचे एकत्रीकरण म्हणजे पुनर्निर्यात व्यापार होय. (T)**

**उत्तर:** i. विदेशी किंवा आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आयात व्यापार, निर्यात व्यापार, पुनर्निर्यात व्यापार हे प्रकार आहेत.
ii. जेव्हा इतर देशाकडून वस्तू व सेवा खरेदी केल्या जातात तेव्हा त्याला आयात व्यापार म्हणतात.
iii. जेव्हा इतर देशांतील खरेदीदाराला वस्तू व सेवांची विक्री केली जाते तेव्हा त्याला निर्यात व्यापार म्हणतात.
iv. पुनर्निर्यात व्यापारात एका देशाकडून माल आयात करून त्याच मालाची दुसऱ्या देशात पुनर्विक्री केली जाते.
v. म्हणूनच, आयात-निर्यात व्यापारांचे एकत्रीकरण म्हणजे पुनर्निर्यात व्यापार होय.

**९. वाहतुकीमुळे स्थान उपयोगिता निर्माण होते. (T)**

**उत्तर:** i. व्यापाराची अनुषंगिक साधने (व्यावसायिक सेवा) व्यापारी कृती सुरळीत चालण्यासाठी साहाय्यक भूमिका बजावतात. वाहतूक ही एक व्यावसायिक सेवा आहे.
ii. वस्तूचे उत्पादन एका ठिकाणी होते; परंतु त्या वस्तूला विस्तृत भौगोलिक क्षेत्रात मागणी असते.
iii. मागणी असणाऱ्या ठिकाणी वस्तूंची वाहतूक करावी लागते.



Sample Content

iv. विशिष्ट जागी वस्तू किंवा सेवा उपलब्ध केल्यामुळे स्थान उपयोगिता निर्माण होते.
v. वाहतुकीची विविध साधने मागणी असलेल्या ठिकाणी वस्तूची वाहतूक करण्यास मदत करतात.
vi. म्हणूनच, वाहतुकीमुळे स्थान उपयोगिता निर्माण होते असे आपण म्हणू शकतो.

**१०. उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य तो वापर करणे आवश्यक असते. (T)**

**उत्तर:** i. साधनसंपत्ती म्हणजे व्यावसायिक कृती पार पाडण्यासाठी आदाने म्हणून वापरले जाणारे सर्व घटक होत.
ii. साधनसंपत्ती दुर्मिळ असते व तिचे पर्यायी उपयोग असतात.
iii. साधनसंपत्तीचा शक्य तेवढा चांगला उपयोग करून तिचा अपव्यय टाळण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असते.
iv. साधनसंपत्तीचा योग्य उपयोग व्यवसायातील नफा वाढवण्यात मदत करतो.
v. म्हणूनच, उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य तो वापर करणे आवश्यक असते.

**खालील घटना व परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा. (T)**

**१. जयसुख तेल कारखाने शुद्ध तेल तयार करतात. ते सर्व उत्पादन रुपेश तेल वितरक विकत घेतो. तो वेगवेगळ्या किरकोळ व्यापाऱ्यांना विक्री करतो. श्रीमती प्राची यांनी बालाजी किराणा दुकानातून दोन (२) किलो तेल विकत घेतले. नावे शोधा -**

**i. उत्पादक - ii. घाऊक व्यापारी - iii. किरकोळ व्यापारी - iv. ग्राहक -**

**उत्तर:** i. उत्पादक म्हणजे अशी व्यक्ती जी वस्तूंचे उत्पादन करते. या घटनेमध्ये जयसुख तेल कारखाना उत्पादक आहे, जो शुद्ध तेलाचे उत्पादन करतो.
ii. घाऊक व्यापारी उत्पादकाकडून मोठ्या प्रमाणात माल खरेदी करतो व किरकोळ व्यापाऱ्याला त्याची लहान प्रमाणात विक्री करतो. या घटनेमध्ये रुपेश तेल वितरक हा घाऊक व्यापारी आहे जो जयसुख तेल कारखाने (उत्पादक) यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर तेल खरेदी करतो व इतर किरकोळ व्यापाऱ्यांना विक्री करतो.
iii. किरकोळ व्यापारी घाऊक व्यापाऱ्याकडून (काहीवेळेस थेट उत्पादकाकडून) माल खरेदी करतो आणि अंतिम ग्राहकाला विक्री करतो. या घटनेमध्ये बालाजी किराणा दुकान हे किरकोळ व्यापारी असून ते रुपेश तेल वितरक (घाऊक व्यापारी) यांच्याकडून तेल खरेदी करतात आणि लहान प्रमाणात अंतिम ग्राहकांना विक्री करतात.
iv. ग्राहक किरकोळ व्यापाऱ्याकडून त्याच्या वैयक्तिक उपभोगासाठी लहान प्रमाणात वस्तू खरेदी करतात. या घटनेमध्ये श्रीमती प्राची ग्राहक आहेत. त्या बालाजी किराणा दुकानातून (किरकोळ व्यापारी) लहान प्रमाणात (२ किलो) तेल स्वत:च्या उपभोगासाठी खरेदी करतात.

**२. श्री. प्रणव हे तांत्रिक वस्तू तयार करण्याचे काम करतात. इंग्लंड येथील श्री. जॅक हे नॉर्थ अमेरिकेतील मे. फ्रँक कॉर्पोरेशनला आपल्या वस्तू विकतात. तसेच यू.एस.ए. येथील श्री. विल्यम्स् हे ब्राझिल येथून काही वस्तू खरेदी करतात. वरील घटनेमध्ये -**

**i. आयातदाराचे नाव ओळखा. ii. उत्पादकाचे नाव काय? iii. निर्यातदाराचे नाव ओळखा.**

**उत्तर:** i. दुसऱ्या देशाकडून वस्तू व सेवा खरेदी करतो तो आयातदार. या घटनेमध्ये दोन आयातदार आहेत.
अ. नॉर्थ अमेरिकेतील मे. फ्रँक कॉर्पोरेशन इंग्लंडमधील (दुसऱ्या देशातील) श्री. जॅक यांच्याकडून वस्तू खरेदी करते. म्हणूनच, मे. फ्रँक कॉर्पोरेशन आयातदार आहे.
ब. यू. एस. ए. मधील श्री. विल्यम्स ब्राझील (दुसरा देश) मधून वस्तू खरेदी करतात. म्हणूनच श्री. विल्यम्स आयातदार आहेत.
ii उत्पादक म्हणजे अशी व्यक्ती जी वस्तूंचे उत्पादन करते. या उदाहरणात श्री. प्रणव हे उत्पादक आहेत कारण ते तांत्रिक वस्तू तयार करतात.
iii. निर्यातदार म्हणजे जो दुसऱ्या देशातील खरेदीदाराला वस्तू व सेवा यांची विक्री करतो. या उदाहरणामध्ये दोन निर्यातदार आहेत:
अ. इंग्लंडचे जॅक हे नॉर्थ अमेरिकेतील मे. फ्रँक कॉर्पोरेशनला आपल्या वस्तू विकतात. म्हणूनच ते निर्यातदार आहेत.
ब. ब्राझिल मधील व्यक्ती यू.एस.ए. येथील विल्यम्स् यांना वस्तू विकते. म्हणूनच, ती व्यक्ती / संस्था निर्यातदार आहे.

Sample Content

## AVAILABLE NOTES FOR STD. XI & XII:

### SCIENCE

**Perfect Series:**

For students who want to excel in board exams and simultaneously study for entrance exams.


- Physics Vol. I
- Physics Vol. II
- Chemistry Vol. I
- Chemistry Vol. II
- Mathematics & Statistics Part - I
- Mathematics & Statistics Part - II
- Biology Vol. I
- Biology Vol. II


**Precise Series:**

For students who want to excel in board exams.

- Physics
- Chemistry
- Biology

**Additional Books for Std. XII Science:**




### COMMERCE (ENG. & MAR. MED.)

**Smart Notes:**

- Book-Keeping and Accountancy
- Book Keeping and Accountancy (Practice)
- Economics
- Organisation of Commerce and Management
- Secretarial Practice
- Mathematics and Statistics - I
- Mathematics and Statistics - II
- Supplementary Questions (BK • ECO • OCM • SP)

### ARTS (ENG. & MAR. MED.)

- History
- Geography
- Political Science
- Psychology
- Sociology

**Books available for MHT-CET, NEET & JEE**

**Languages:**

- English Yuvakbharati
- Hindi Yuvakbharati
- Marathi Yuvakbharati




Scan the QR code to download our Quill App & get free access of 1 chapter

### OUR PRODUCT RANGE

Children Books | School Section | Junior College

Degree College | Entrance Exams | Stationery

**Target Publications® Pvt. Ltd.**

*Transforming lives through learning.*

**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080

**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org




Explore our range of STATIONERY

**Visit Our Website**